**Lokmat 20.03.20**

# वानवडीतील मुख्य ११ चौकांवर राहणार तिसऱ्या डोळ्याची नजर

लोकमत न्यूज नेटवर्क

**वानवडी :** जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे हे एक आवश्यक आणि गरजेचे काम आहे. त्याचप्रमाणे समाजातील अपप्रवृत्ती दूर करण्यासाठी नागरिक व पोलिसांनी एकत्र येणे गरजेचे असून, ती एक संरक्षण व सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाची बाब ठरेल, असे मत अप्पर पोलीस आयुक्त सुनील फुलारी यांनी व्यक्त केले.

वानवडीमध्ये लोकप्रतिनिधी प्रशांत जगताप व रत्नप्रभा जगताप यांच्या प्रयत्नाने महापालिका विकासनिधीमधून वानवडीतील ११ चौकांत बसवण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेरांच्या शुभारंभाच्या कार्यक्रमप्रसंगी सुनील फुलारी बोलत होते. या वेळी झोन पाचचे पोलीस उपायुक्त सुहास बावचे व वानवडी वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतीकुमार पाटील, केदारी गार्डनचे मालक उत्तम केदारी, मारुतराव जगताप, दिलीप



जांभूळकर, प्रफुल्ल जांभूळकर व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

वानवडीमधील छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारक, जांभूळकर चौक, महात्मा फुले नाट्यगृह चौक, बँक ऑफ महाराष्ट्र चौक, परमारनगर गेट, सत्यविहार चौक, शांतीनगर कॉर्नर, मदर तेरेसा चौक, केदारी पेट्रोल पंप चौक, संविधान चौक, रुबी हॉल कमान व चौक या सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. वानवडी बाजार पोलीस चौकीतून या सर्व चौकांवर २४x७ नजर ठेवली जाणार आहे. याचा बॅकअप डेटा हा ४० दिवसांचा असणार आहे. एखादी संशयास्पद हालचाल वाटल्यास किंवा चोरीच्या घटना या कॅमेरामध्ये सापडल्यास नागरिकांना त्वरित याची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

आजपासून पुढील दहा दिवसांत ११ ठिकाणी सीसीटीव्ही लावण्याचे काम पूर्ण होणार असून ते पूर्णतः कार्यान्वित होणार असल्याची ग्वाही यावेळी लोकप्रतिनिधी प्रशांत जगताप यांनी दिली

**Punyanagari 21.03.20**

# शहरात दीडशे हॉटेल्स, दुकानांवर गुन्हे दाखल

**पुणे :** कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी व्हावा, तसेच रस्त्यावरील नागरिकांची गर्दी टाळण्यासाठी शहरातील हॉटेल्स, दुकाने बंद ठेवण्याचे आदेश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. त्या आदेशाचा भंग करून शहरातील विविध भागात दुकाने तसेच हॉटेल्स सुरू ठेवल्याप्रकरणी पोलिसांकडून दोन दिवसांत दीडशेपेक्षा अधिक हॉटेल्स तसेच दुकानांवर कारवाई करून आयपीसी १८८ अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

गर्दीमध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढून त्याची लागण होवू नये, यासाठी प्रशासनाकडून योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे. यामध्ये दुकान तसेच हॉटेल व्यावसायिक स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते. शहरात सर्व भागात प्रभावीपणे त्याची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत आहे. मात्र, काही ठिकाणी चहाच्या टपऱ्या तसेच हॉटेल्स सुरू असल्याचे दिसून येत होते. मेडिकल दुकाने तसेच किराणा भाजीपाला आदी जीवनावश्यक वस्तू विक्रीस सूट देण्यात आलेली आहे. दरम्यान, हॉटेल दुकाने बंद ठेवावीत, यासाठी प्रशासनाने आदेश काढलेला असताना तो आदेश धुडकावून शहरातील काही भागात दुकाने हॉटेल्स सुरू असल्याचे दिसून आले. अशांवर पोलिसांनी आयपीसी कलम १८८ अंतर्गत कारवाई केली. गुरुवारी (दि.१९ मार्च) ७८ व्यावसायिकांवर गुन्हे दाखल केले होते. तसेच, शुक्रवारी (दि.२० मार्च) रात्री साडेसात वाजेपर्यंत ७६ दुकाने, हॉटेल्सवर गुन्हे दाखल केले आहेत. एकूण दोन दिवसांत १५४ जणांवर कारवाई केल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पाहता व्यावसायिकांनी दुकाने बंद ठेवावीत, तसेच नागरिकांनी घरी राहून रस्त्यांवर होणारी गर्दी टाळण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**Lokmat 25.03.20**



नाकाबंदी : कोरोनामुळे शहरात संचारबंदी असल्याने पोलीस ठिकठिकाणी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांची चौकशी करताना दिसून येत आहेत.

**Sakal 24.03.20**



प्रवेश बंद... बुधवार पेठ : वाहने रस्त्यावर येऊच नयेत, यासाठी पोलिसांनी बेल बॅरिकेड लावून शिवाजी रस्ता वाहतुकीसाठी बंद केला.

**Lokmat 31.03.20**

## आरोग्यसेविकांचे पोलीस संरक्षणात कामकाज....



[illegible]

**Pudhari 20.03.20**

## दुकाने बंद करण्याचे आवाहन...



कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. विषाणूंचा फैलाव होण्यास कारणीभूत ठरणारी गर्दी टाळण्यासाठी आस्थापना बंद ठेवण्याचे आवाहन केले होते. गुरुवारी टिळक रस्त्यावर तुरळक ठिकाणी उघडी असलेली दुकाने बंद करण्याचे आवाहन करताना पोलिस कर्मचारी.

**Lokmat 30.03.20**

## पोलिसांकडून तपासणी...



कोरोनामुळे संचारबंदी असल्याने विनाकारण कोणी फिरत तर नाही ना, याची तपासणी पोलीस बालेवाडी चौकात करीत आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या सेवांना सवलत दिलेली आहे.

**Prabhat 24.03.20**

# आदेश धडकताच शहराच्या सर्व सीमा बंद!

## प्रत्येक प्रवेशद्वारावर कडेकोट बंदोबस्त : विनाकारण फिरणाऱ्यांना तंबी आणि काठीचा 'प्रसाद'






पुणे : शहरात पोलिसांकडून सोमवारी ठिकठिकाणी रस्त्यांवर बॅरिकेट लावण्यात येत होते. तसेच, वाहनचालकांना अडवून त्यांची चौकशी करण्यात येत होती. शिवाय, विनाकारण फिरणाऱ्यांना थांबवून त्यांना घरी जाण्यास सांगण्यात येत होते.

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २३ - करोनाच्या पार्श्वभूमीवर पुन्हा गर्दी होऊ नये, यासाठी शेवटचा उपाय म्हणून राज्य सरकारने संपूर्ण राज्यात ३१ मार्चपर्यंत संचारबंदी लागू केली. यामुळे आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या सीमा बंद करण्यात आल्या असून, एस.टी., रेल्वे पाठोपाठ आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय विमानसेवाही बंद केल्या आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोमवारी दुपारी याची घोषणा केल्यानंतर कात्रज-खडी चौक येथे कोंढव्यातून पुणे शहरात प्रवेश करण्यासाठी बंदी घालण्यात आली आहे. येथे प्रत्येक वाहनांची पोलीस कसून चौकशी करत आहेत. औंध येथील ब्रेमेन चौकातही अशीच परिस्थिती आहे. या चौकातून विद्यापीठ रस्त्याने कोणालाही सोडण्यात येत नाही. पुणे-मुंबई रस्त्यावर वाकडेवाडी येथे वाहने अडवून त्यांना परत पाठवण्यात येत आहे. याशिवाय येरवडा येथे गुंजन टॉकिज आणि बंडगार्डन पुलाजवळ वाहने अडवून तपासणी करण्यात येत आहे. हडपसरमध्ये गाडीतळ येथे रस्ता बंद करण्यात आला होता. तेथून पुढे वाहनांना येऊ दिले जात नव्हते. पण शहराबाहेर जाणाऱ्या वाहनांना अडवण्यात येत नव्हते. प्रत्येक ठिकाणी रस्त्यावर वाहने अडवण्यात येत असल्याने वाहन चालक पोलिसांशी हुज्जत घालत होते. अशावेळी पोलीस मात्र समजुतीची भूमिका घेत 'आपल्या सुरक्षेसाठीच ही संचारबंदी लागू झाली आहे तुम्हीच जर त्याचे पालन केले नाही तर मग अवघड होईल,' असे सांगत होते. ऐवढे सांगूनही जर कोणी ऐकत नसतील,

### सर्व प्रकारच्या सार्वजनिक कार्यक्रमांवरही बंदी

तर त्याला शेवटी पोलिसी खाक्या दाखवत हाकलून देण्यात येत होते. यामधून अत्यावश्यक सेवा वगळण्यात आल्या आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

"करोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सोमवारी सकाळपासून शहरामध्ये जमावबंदी लागू करण्यात आली आहे. त्यामुळे लोकांनी घराबाहेर पडण्याचे टाळावे. अत्यावश्यक सेवा व सेवा पुरविणाऱ्यांना वगळता जमावबंदीचा आदेश सर्वांना लागू असणार आहे. त्यादृष्टीने नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी. तसेच, घराबाहेर पडण्याचे टाळावे."

— डॉ. के. व्यंकटेशम, पोलीस आयुक्त

### ओळखपत्र सोबत बाळगणे बंधनकारक

सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, शिक्षक यांनी त्यांचे नेमणुकीचे आदेश परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र, ओळखपत्रसोबत बाळगणे बंधनकारक असल्याचे जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे.

**Prabhat 21.03.20**

# वानवडीतील पान टपऱ्यांवर कारवाई

**वानवडी, दि. २० -** फातिमानगर, पुलगेट, लुल्लानगर, कोंढवा या परिसरात गुटख्याची व पान मसाल्याची दुकानांवर कारवाई करण्यात आली आहे. या मध्ये ५० पानटपऱ्यावर कारवाई करण्यात आली असून दहा हजार रुपये दंड वसुल करण्यात आल्याचे वानवडी क्षेत्रीय कार्यालय आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले.

राज्यात दिवसेंदिवस करोना बाधित रुग्णांची संख्या वाढत असून महानगरपालिका प्रशासनाकडून सार्वजनिक ठिकाणी पान, गुटखा, तंबाखू खाऊन सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांवर कारवाई कधी होणार. याबाबत दैनिक प्रभातमध्ये बातमी प्रसिध्द करण्यात आली होती. या बातमीची दखल घेऊन जिल्हाधिकारी यांनी पुणे शहरातील आणि उपनगरातील पान टपऱ्या बंद ठेवण्याचे आदेश काढले आहे.तसेच थुंकी बाहाद्दरांवर ही कारवाई करण्यात सुरुवात केली आहे. वानवडी,

**Pudhari 29.03.20**




लॉकडाऊनमुळे शहरात अत्यावश्यक सेवेतील नागरिक व जीवनाश्यक वस्तू विक्री करणारे वगळता रस्त्यावर कोणीही दिसत नाही. शनिवारी फर्ग्युसन रस्त्यावर हातगाड्यावर भाजीपाला विक्री करताना विक्रेता. तर दुसऱ्या छायाचित्रात शनिवारपेठेत गस्त घालताना पोलिस कर्मचारी.

## Sakal 24.03.20

**संसर्ग रोखण्यासाठी...**

कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी राज्य सरकारकडून पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांत जमावबंदी आदेश लागू करण्यात आला. तरीही पुणे शहरात विनाकारण फिरणाऱ्या नागरिकांना पोलिसांनी सोमवारी काही ठिकाणी समज दिली, तर काहींना पोलिसी खाक्या दाखविण्यात आला. नाकाबंदी करून वाहनांची तपासणीही करण्यात आली.

#WeCareForPune



बेलबाग चौक



जनता वसाहत



शिवाजीनगर

## Sakal 30.03.20




डेक्कन : अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्या व गरजू नागरिकांनी शहर परिसरात वावर करण्यासाठी QR कोडची नोंदणी पोलीस वेबसाईटवर जाऊन करणे क्रमप्राप्त असल्याने प्रवासी वाहनचालक या सेवेचा लाभ घेत आहे.

## Pudhari 30.03.20

# यहां पे सब शांती शांती है

**▌लॉकडाऊनमुळे रस्ते ओस ▌चौका-चौकांत पोलिसांनी ठोकले तंबू**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाचा संसर्ग वाढत असल्याने देश लॉकडाऊन करण्यात आला आहे. शहरातील सर्व रस्ते जागोजागी बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आले. त्यामुळे दिवस-रात्र धावणारे पुणे शहर थांबलेले आहे. शहरात सर्वत्र नीरव शांतता पाहायला मिळत आहे.

एरव्ही गजबजलेला लक्ष्मी रस्ता, मंडई परिसर, तुळशीबाग, रविवार पेठ, शिवाजी रस्ता, सारसबाग परिसर, बाजीराव रस्ता, पुणे स्टेशन परिसरात शुकशुकाट पहायला मिळत आहे. फक्त जीवनावश्यक वस्तूंची दुकाने सुरू असून या ठिकाणीही नागरिक सोशल डिस्टन्स राखून खरेदी करताना दिसतात.

**शहराला छावण्यांचे स्वरूप**

शहरात असलेल्या मोठ्या चौकापासून लहानात लहान चौकात पोलिसांकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शहराला छावण्यांचे स्वरूपच आले आहे. चौकाचौकात पोलिसांनी तंबू ठोकले असून येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकाची कसून चौकशी करण्यात येत आहे.



लॉकडाऊनमुळे चौका-चौकात कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**महामार्गावर गावी जाणाऱ्यांची गर्दी**

लॉकडाऊनमुळे एकीकडे शहर शांत आहे तर दुसरीकडे महामार्गावर गावी जाण्यासाठी नागरिक गर्दी करत आहेत. शहरात लगत असलेल्या खेड-शिवापूर टोलनाक्यावर देखील नागरिक थांबलेले दिसून आले. येथील पोलिसांकडून वाहनचालकांची चौकशी करतात. विनाकारण फरबाहेर पडलेल्यांना खाकीचा हिसकाही दाखवला जात आहे.

## Pudhari 21.03.20

# सिंहगड रोड परिसरात पोलिसांची गस्त

**धायरी : पुढारी वृत्तसेवा**

सिंहगड रोड परिसरातील विठ्ठलवाडी, हिंगणे खुर्द, आनंदनगर, सनसिटी, माणिकबाग, वडगाव बुद्रुक, वडगाव खुर्द, धायरी, नऱ्हे परिसरात कडकडीत बंद पाळण्यात आला. अत्यावश्यक सेवा वगळता सर्व हॉटेल, स्वीट होम, हार्डवेअर, कापड, स्टेशनरी मोबाईल, गॅरेज, फोटो स्टुडिओ, बेकरी, ज्वेलर्स आदी अनेक दुकाने बंद ठेवण्यात आली होती. परिसरात व रस्त्यावर शुकशुकाट दिसून येत होता.

या परिसरात मोठमोठ्या शैक्षणिक संस्था, गृहप्रकल्प, औद्योगिक वसाहती, हॉस्पिटल, सरकारी, निमसरकारी कार्यालये, केंद्र व राज्य शासनाचे विविध प्रकल्प आहेत, त्यामुळे येथे सतत वर्दळ असते. सध्या परिसरात शुकशुकाट पाहायला मिळत असून अनेक कुटुंबे आपल्या गावी परतत



सिंहगड रोड परिसरात बंद असलेली दुकाने.

असल्याचे दिसून येत आहे. परिसरात पोलिसांची सतत असलेल्या गस्तीमुळे येथील दुकाने बंद असून नागरिक घरीच राहणे पसंत करीत आहेत. अत्यावश्यक सेवा वगळून जी दुकाने उघडी दिसतील, त्यांच्यावर खटले भरण्याचे आदेश सिंहगड रोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नंदकिशोर शेळके यांनी अधिकारी, कर्मचारी व बीट मार्शल यांना दिले आहेत.

## Sakal 24.03.20

# राज्य लॉकडाउन

## जिल्ह्यांच्या सीमाही बंद

सकाळ न्यूज नेटवर्क

**मुंबई, ता. २३ : कोरोनाचा फैलाव समूहपातळीवर पसरण्याच्या धोक्या अलीकडच्या टप्प्यावर असताना मुंबई आणि पुण्यातील शहरी नागरिकांनी घराबाहेर पडून गर्दी करून वाहतूक कोंडी होण्यापर्यंतचा बेजबाबदारपणा दाखविल्यानंतर राज्य सरकारला नाइलाजाने राज्यभरात लॉकडाउन जाहीर करावे लागत असल्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज सायंकाळी केली. याबाबतचा अध्यादेशही जारी करण्यात आला. या साथीचा फैलाव इतरत्र होऊ नये, यासाठी राज्यातील जिल्ह्यांच्या सीमादेखील बंद करण्याचे जाहीर करण्यात आले आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काल 'जनता कर्फ्यू'च्या केलेल्या आवाहनाला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मात्र, सायंकाळी टाळ्या आणि थाळीनादानंतर उत्साह संचारलेली जनता आज स्वैरपणे रस्त्यावर संचार करताना दिसत होती. मागच्या काही दिवसांमध्ये घरात बसलेली नोकरदार मंडळी रेल्वे, बस वाहतूक बंद असतानाही खासगी वाहनांनी घराबाहेर पडली. मुंबई, पुण्यात तर अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी झाली. रस्त्यावर झालेली गर्दी राज्य सरकारच्या चिंतेत भर घालणारी असल्यानेच अखेरीस संपूर्ण राज्यातील जनतेला आपापल्या घरात लॉकडाउन व्हावे लागणार आहे.

लॉकडाउनची घोषणा करताना उद्धव ठाकरे म्हणाले, "कोरोनाचा प्रादुर्भाव जर आत्ताच रोखला नाही, तर जगात सुरू असलेले थैमान आपल्याकडेही होईल. जनता कर्फ्यू' चांगल्या पद्धतीने पाळण्यात आला. मात्र थाळ्या, घंटा वाजवणे हे कठीण परिस्थितीत सतत काम करणारे डॉक्टर, पोलिस, महापालिका कर्मचारी यांच्यासाठी होते. कोरोनाविरुद्धची लढाई अजून आपल्याला जिंकायची आहे."



लाल महाल चौक : कोरोनाच्या संसर्गाचे गांभीर्य ओळखून नागरिकांनी विनाकारण रस्त्यावर फिरू नये म्हणून समज देताना पोलिस अधिकारी.

## Sakal 29.03.20




कोथरूड : नागरिकांचा वावर पोलीस चौकीतही मोठ्या प्रमाणावर होत असल्याने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या नागरिकांनी सुरक्षित अंतरावर उभे राहत आपल्या तक्रारी नोंदवाव्या यासाठी अलंकार पोलीस चौकीबाहेर चौकोन आखण्यात येत आहेत.

## Pudhari 27.03.20

### संचारबंदी मोडणाऱ्यांची चौकशी




शहरातील खडकी बाजार येथे रस्त्यावर निघणाऱ्या लोकांची कसून चौकशी करताना पोलिस.

## Prabhat 07.04.20

### नाकाबंदीची पाहणी...



पुणे : जंगली महाराज रस्त्यावरील नाकाबंदीची पाहणी शहर पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी सोमवारी केली. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांना सूचनाही केल्या.

## Lokmat 17.04.20

पुणे पोलिसांचा अनोखा उपक्रम : नागरिकांकडून संचारबंदीचे उल्लंघन

# विनाकारण फिरणाऱ्यांना सूर्यनमस्कार घालण्याची शिक्षा



## न ऐकणाऱ्यांना काढायला लावल्या उठाबश्या

हडपसरमध्ये मॉर्निंग वॉक करणाऱ्या ५० जणांवर गुन्हा दाखल

## Lokmat 04.04.20

नागरिक दाखवताहेत बेजबाबदारपणा : टेरेसवर घोळक्याने फिरणाऱ्यांवर नजर

# ड्रोनद्वारे कारवाई करण्यास पोलिसांची सुरुवात

आदेशाचा भंग केल्यास कारवाई



## सरकारी कामात अडथळा; सोळाशे वाहने केली जप्त

## Lokmat 05.04.20

# पुण्यातील ५० रुग्णांच्या संपर्कातील ८०० व्यक्तींचा घेतला शोध



ड्रोनद्वारे नजर... : शहरात संचारबंदी असताना अनेक जण विनाकारण फिरत आहेत. तसेच गल्लीबोळांतील एकत्र येत आहेत. म्हणून पोलीस ड्रोनद्वारे त्यांच्यावर नजर ठेवणार आहेत. त्याचे प्रात्यक्षिक करताना पोलीस.

## Lokmat 12.04.20





कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासनाने मंडई बंद करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पिंपरी मंडई बंद होती. परंतु, चिंचवड मंडईमध्ये पोलिसांना त्यांच्या भाषेत विक्रेत्यांना समजावावे लागले. त्यामुळे मंडई बंद करण्यात आली.

## Lokmat 06.04.20

## बाळासाठी तरी घरी राहा...



कोरोनाचा फैलाव होऊ नये म्हणून संचारबंदी लागू केली. तरी काही जण बाहेर फिरत आहेत. एक जोडपी आपल्या चिमुकल्यासह पोलिसांना दिसले. जोडप्याने मास्क घातले होते. मात्र चिमुकल्याला मास्क घातले नव्हते. तेव्हा पोलिसांनी त्यांना चांगलेच खडसावले आणि बाळासाठी तरी घरी राहा, असे सुनावून घरी पाठवले.

## Lokmat 08.04.20

झोपडपट्टीत अजून गांभीर्य कमी : ड्रोनद्वारे अनेक जण दिसले फिरताना; बहुतांश ठिकाणी १०० टक्के बंद पाहायला मिळाला

# प्रतिबंधित मध्य भागात कडक बंदोबस्त



## माझ्या बाळाची दुधाची तहान भागवली पाण्यावर

दुकाने बंद : नागरिकांचे झाले हाल

### 'त्या' परिसरावर ड्रोनद्वारे वॉच

### पॉझिटिव्ह आढळल्याने आले भान

### पेठांमध्ये प्रतिसाद

## Lokmat 11.04.20

# सिंहगड रस्त्याच्या गल्ल्या बॅरिकेड टाकून बंद

## जीवनावश्यक वस्तूंचा कोणताही तुटवडा नाही

### सिंहगड रोड परिसरातील अनुक्रमे बंद केलेल्या गल्ल्या



## Lokmat 09.04.20



पुण्यातील कोरोना संसर्गाची परिस्थिती लक्षात घेऊन गरज भासेल त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने कर्फ्यू वाढविण्यात येणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून बुधवारी सायंकाळी कात्रज येथील राजीव गांधी प्राणी संग्रहालय चौकात पथसंचलन करण्यात आले.

## Lokmat 09.04.20



**बेघरांची निवारा केंद्रात रवानगी :** पुणे रेल्वे स्टेशन ते आंबेडकर भवन रस्त्यावरील असलेल्या फुटपाथवर राहणाऱ्या बेघर लोकांना पुणे पोलिसांनी आज कारवाई करीत निवारा केंद्रामध्ये हलविले. यावेळी त्या लोकांच्या झोपड्या तोडून त्या ठिकाणी औषध फवारणी करण्यात आली.

**Lokmat 15.04.20**

सिंहगड रोड, वारजे, कोथरुडमधीलही भागाचा समावेश : ताडीवाला रस्ता, विश्रांतवाडी, कळस, येरवड्यातीलही भाग

# पोलिसांकडून आणखी २८ भाग सील

लोकमत न्यूज नेटवर्क

नव्याने सील करण्यात येणारे १२ पोलीस ठाण्यांतील भाग






**Lokmat 11.04.20**

# आज आमच्यावर पहारा.. उद्या तुमच्यावर असेल

कोरोनाशी दोन हात करण्यासाठी तयार राहावेच लागेल : प्रवेशबंद केलेल्या भागात निर्धार

लोकमत न्यूज नेटवर्क



**Lokmat 16.04.20**

# सिंहगड रस्त्यावर अनधिकृत भाजीविक्रीस मनाई



सिंहगड रस्त्यावर भाजीपाला, फळविक्री करणाऱ्या अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली.

धायरी : कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी सिंहगड रस्ता येथील भाजीपाला, फळविक्रेत्यांना रस्त्यावर विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे. भाजीपाला व फळे घेण्यासाठी नागरिक रस्त्यावर गर्दी करताना दिसून येत असल्याने प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

> सोसायट्यांनी आपापल्या पद्धतीने सोसायटीत भाजीपाला विक्रीस उपलब्ध होईल याचे नियोजन करावे. प्रशासनाकडूनही विक्रेत्यांस आवाहन करण्यात येते आहे की, आपण प्रत्येक सोसायटीच्या आवारात भाजीविक्रीस न्यावी, जेणेकरून नागरिकांना घराबाहेर जावे लागणार नाही.
>
> - धैरत दोडवोले, सहायक पोलीस निरीक्षक, सिंहगड रस्ता, पोलीस ठाणे.

**Lokmat 09.04.20**

# शहरातील कर्फ्यू टप्प्याटप्प्याने वाढविणार

पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम : चार पोलीस ठाण्यांच्या हद्दीत पोलिसांचा रुट मार्च

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : शहरातील काही भागात कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. एकमेकांच्या संपर्कात आल्यामुळे कोरोना विषाणूचा संसर्ग वाढण्याची शक्यता असल्याने शहराच्या मध्य भागात ४ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत महापालिकेने कर्फ्यू लावला आहे. हा कर्फ्यू शहरातील कोरोना संसर्गाची परिस्थिती लक्षात घेऊन गरज भासले त्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने वाढविण्यात येणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून बुधवारी सायंकाळी कात्रज येथील राजीव गांधी प्राणिसंग्रहालय चौकात पथ संचलन घेतले असल्याचे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी सांगितले.

शहरातील काही भागात आज शहर पोलिसांच्या वतीने रुट मार्चचे आयोजन करण्यात आले होते, त्या वेळी ते बोलत होते. सहपोलीस आयुक्त रविंद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस उपायुक्त संभाजी पाटील, शिरीष सरदेशपांडे आदी या वेळी उपस्थित होते.

पुण्यातील कोरोना रुग्णांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, पुणे पोलीस अलर्ट झाले आहे. मंगळवारपासून शहराच्या मध्यवर्ती भागातील चार पोलीस ठाणे हद्दीतील पेठांचा भाग सील केला आहे. बुधवारी शहरातील कोरोनाबाधित मृत्यूंचा आकडा अचानक वाढल्याने ज्या भागात व्याप्ती आणि परिणामकारकता जास्त आहे, अशा भागावर आगामी काळात लक्ष केंद्रित करायचे असल्याचे पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी सांगितले. तसेच, सोशल पोलिसिंगच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक, बेघर, तृतीयपंथी, वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिला यांना कर्तव्याच्या भावनेतून मदत करणे आवश्यक आहे.

**दहा दिवसांचा किराणा भरून ठेवा**

कोरोनाचा संसर्ग दिवसेंदिवस वाढत आहे, तसेच मृत्यूची संख्याही वाढत आहे. मात्र, असे असतानाही नागरिक दररोज भाजीपाला खरेदी करण्यासाठी बाहेर पडत आहेत. शहरातील कोरोना संसर्गाची स्थिती लक्षात घेता टप्प्याटप्प्याने कर्फ्यू इतरही भागात लावला जाऊ शकतो. यामुळे नागरिकांनी १० दिवसांचा किराणा एकदाच भरून ठेवावा. खरेदीसाठी सारखे-सारखे बाहेर पडल्याने संसर्गाची लागण होऊ शकते. संचारबंदी प्रतिबंधात्मक कारवाई मोठ्या प्रमाणात सुरु असून अनावश्यक बाहेर फिरणाऱ्या ९१०० गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत. पोलिसांना मास्क, ग्लोव्हज, सॅनिटायझरसारख्या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर सीआरपीच्या २ तुकड्या आमच्यासोबत सामील आहेत. नागरिकांनी जास्तीत जास्त घरातच थांबण्याचे आवाहन पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी केले.

**Loksatta 09.04.20**

# संपूर्ण शहरभर बांबूचे अडथळे; गूढ कायम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

पुणे: करोनाच्या संसर्गाला अटकाव घालण्यासाठी शहरातील पूर्व भागात टाळेबंदी करण्यात आल्यानंतर या भागात कडक निर्बंध (कर्फ्यू) लागू करण्यात आले. कडक निर्बंध असलेल्या भागात बांबूचे अडथळे उभारण्यात आल्यानंतर संपूर्ण शहरात तसेच उपनगरात अडथळे उभारण्याचे पेव फुटले. शहरातील पेठांसह उपनगरातील छोट्या रस्त्यांवर अडथळे उभारणीचे काम सुरू असल्याचे पाहायला मिळाले. एका दिवसात संपूर्ण शहरात अडथळे निर्माण करण्यात आले. प्रतिबंधित भाग सोडता शहरातील अन्य भागात अडथळ्यांची उभारणी पोलिसांनी केली, अशी माहिती जिल्हा प्रशासन तसेच महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

शहरातील पूर्व भागात कठोर निर्बंध घालण्याचे आदेश पुणे पोलिसांनी मंगळवारी रात्री दिले. या भागातील रहिवासी नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करण्यासाठी सकाळी दोन तासांची वेळ देण्यात आली. शहरातील फरासखाना, खडक, स्वारगेट, कोंढवा या चार पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील निश्चित करण्यात आलेल्या भागात कठोर निर्बंध घालण्यात आले.

तेथील वाहतूक तसेच संचारावर निर्बंध घालण्यासाठी अडथळे उभारण्यात आले आहेत. त्यानंतर रात्रीत शहरातील अन्य भागांतही अडथळे उभारण्यात आले. सिंहगड रस्ता, बिबवेवाडी, कोथरूड, कर्वेनगर भागातही अडथळे उभारण्यात आले.

याबाबत सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांच्याशी संपर्क साधण्यात आला असता ते म्हणाले, की जो भाग प्रतिबंधित करण्यात आला आहे, तेथेच अडथळे उभारण्यात आले आहेत. शहरातील अन्य भागात अडथळे उभारण्यात आले का, याबाबतची माहिती घेण्याचे काम सुरू आहे. शहरात संचारबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. हे आदेश पुढील मंगळवारपर्यंत (१४ एप्रिल) लागू राहणार आहेत. विनाकारण फिरणाऱ्यां विरोधात पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे.

## अडथळे उभारणीत पोलीस सक्रिय



करोनामुळे शहरात संचारबंदीचे आदेश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी बुधवारी शहरातील वेगवेगळ्या भागात संचलन केले, तसेच नागरिकांना घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले.

> जो भाग प्रतिबंधित करण्यात आला आहे, त्या भागातच अडथळे बांधण्यात आले आहेत. त्याव्यतिरिक्त जिल्हा प्रशासनाकडून शहरातील वेगवेगळ्या भागात अडथळे टाकण्याबाबत कोणत्याही प्रकारचे आदेश देण्यात आले नाहीत.
>
> **- नवलकिशोर राम,** जिल्हाधिकारी

> प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून महापालिकेने शहरातील दोन भागात कठोर निर्बंध घालण्याचा प्रस्ताव केला होता. या प्रस्तावाला जिल्हाधिकारी, पोलिसांनी मान्यता दिली आहे. या व्यतिरिक्त शहरातील अन्य कोणत्याही भागात दुसरा कठोर निर्बंध घालण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही. शहर तसेच उपनगरातील काही भागात अडथळे असतील तर ते पोलिसांनी त्यांच्या अधिकारात उभारले असतील.
>
> **- शेखर गायकवाड,** महापालिका आयुक्त

### चेहऱ्यावर मास्क परिधान करणे बंधनकारक

पुणे : करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अत्यावश्यक सेवेत काम करणारे अधिकारी, कर्मचारी यांच्यासह, घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी वावरताना चेहऱ्यावर मास्क परिधान करणे बंधनकारक असल्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी बुधवारी प्रसृत केले.

करोनाचा प्रादुर्भाव अत्यावश्यक सेवेतील कार्यालये, तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांना होऊ नये म्हणून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. त्यानुसार शासकीय कार्यालयांमध्ये करोनाचा प्रसार रोखण्यासाठी सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना कार्यालयीन प्रवेशद्वारापासून ते कार्यालय सोडेपर्यंत चेहऱ्यावर मास्क परिधान करणे बंधनकारक आहे.

**Loksatta 27.04.20**

# स्वस्त धान्य दुकानदारांसाठी पोलिसांकडून नियमावली

## गर्दी, गोंधळ झाल्यास दुकान बंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

पुणे : करोनामुळे नागरिकांना स्वस्त धान्य दुकानातून गहू, तांदूळ देण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर दुकानांमध्ये होणारी गर्दी टाळून सामाजिक अंतर पाळण्याची सूचना पोलिसांकडून करण्यात आली आहे. शहरातील स्वस्त धान्य दुकानदारांसाठी पोलिसांनी नियमावली तयार केली असून नियमांचे पालन न केल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. एखाद्या दुकानदाराने नियमांचे पालन न केल्यास दुकान बंद करण्याचे आदेश दिले जाऊ शकतात. तसेच दुकानाच्या परिसरात गर्दी केल्यास नागरिकांना घरी परत जाण्याची सूचना देण्यात येईल.

नागरिकांना स्वस्त धान्य मिळावे म्हणून शासनाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. मे आणि जून महिन्यात अंत्योदय अन्न धान्य योजना, अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट असलेल्या केशरी शिधापत्रिकाधारकांना सवलतीच्या दरात धान्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

नागरिकांनी दुकानात एकाच वेळी गर्दी करू नये, यासाठी पोलिसांनी नियमावली तयार केली आहे. अन्नधान्य वितरण कार्यालयाकडून सूचना देण्यात आल्या आहेत. नियमावलीची अंमलबजावणी करून धान्याचे वितरण करावे, अशी सूचना करण्यात आली आहे.

**पोलीस नेमणार**

सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत स्वस्त धान्य दुकाने सुरू ठेवण्याची मुभा देण्यात आली आहे. टोकन मिळवण्यासाठी नागरिक सकाळी आठपूर्वी गर्दी करू शकतात. त्यामुळे स्वस्त धान्य दुकानांच्या परिसरात पोलीस नेमण्यात येणार आहेत. नागरिकांनी खरेदी करताना सामाजिक अंतर ठेवावे. रांगेत उभे राहिल्यास अंतर ठेवावे. त्यासाठी दुकानदारांनी दुकानांच्या समोर पांढरे पट्टे आखावेत. नागरिक तसेच दुकानदारांनी मास्कचा वापर करावा. सूचना देण्यासाठी दुकानदारांनी ध्वनिवर्धकाचा वापर करावा. सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी दुकानदारांची आहे. जर एखाद्या दुकानात गर्दी झाल्यास किंवा तेथे नियमांचे पालन न केल्यास त्वरित दुकान बंद करण्याची सूचना करण्यात येईल. तेथे जमलेल्या नागरिकांना घरी पाठविण्यात येणार आहे.

## Mata 08.04.20







# चार पोलिस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी

## खडक, फरासखाना, स्वारगेट आणि कोंढवा पोलिस ठाणे परिसरात आदेश






### शहरातील हे भाग पूर्णपणे 'सील'

### सहा हजार वाहने जप्त

## Mata 04.04.20



**पोलिसांची गस्त...**

'लॉकडाउन'च्या काळात नागरिकांनी घराबाहेर पडू नये, म्हणून शहरात ठिकठिकाणी रात्रीही पोलिसांची गस्त सुरू आहे.

## Mata 09.04.20

# चार भागांत कडक संचारबंदी

## 'करोना' रुग्णांच्या संख्येत वाढ होत असल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेचा निर्णय

म. टा. प्रतिनिधी, पिंपरी

शहरात गेल्या काही दिवसांत 'करोना'बाधित रुग्णांची संख्या वाढत चालल्याने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आदेशानुसार महापालिकेने शहरातील चार भागांत कडक संचारबंदी लागू केली आहे. यामध्ये चिखली, पिंपरी, दिघी आणि भेरगाव परिसरातील काही भागांचा समावेश आहे. हा परिसर 'सील' केल्यामुळे पुढील आदेश येईपर्यंत येथील रहिवाशांना घराबाहेर पडण्यास मनाई करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात अद्यापपर्यंत २१ 'करोना'बाधित रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी १२ रुग्ण पूर्ण बरे झाल्याने त्यांना घरी सोडण्यात आले आहे. मात्र, पुन्हा शहरात संशयित रुग्णांची संख्या वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे शहरात आरोग्यविषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झालेली आहे. 'करोना'च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणास्तव महापालिका क्षेत्रात आपत्कालीन उपाययोजना लागू करण्याची व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. 'करोना'बाधित रुग्णांची संख्या विचारात घेता शहरात रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शहरातील काही भागांत पुढील काही दिवस नागरिकांच्या हालचालींवर, बाहेर फिरणाऱ्यावर मर्यादा आणणे आवश्यक आहे. त्यामुळे शहरातील परिसर 'सील' करण्यात आला आहे.

### नियम काय सांगतो?

'महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०' नुसार क्षेत्र प्रतिबंधित क्षेत्र प्रतिबंधित करणे, क्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधित करणे, क्षेत्रातून वाहनांचे आवागमन प्रतिबंधित करणे; तसेच भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ प्रमाणे संभाव्य होणाऱ्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मानवी आरोग्याला व जीविताला धोका निर्माण होण्याचा संभव आहे. याकरीता कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध व नियंत्रण याबाबतचे आदेश लागू करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ मधील (एपिडेमिक ॲक्ट) तरतुदीनुसार, पिंपरी-चिंचवड शहरातील हा भाग 'सील' केला आहे.



सचिन फुलसुंदर

चिखली येथील घरकुल परिसरात प्रवेशबंदी लागू करण्यात आल्याने बाहेर पडणाऱ्या नागरिकांची पोलिस कसून चौकशी करीत आहेत.

| | दृष्टिक्षेपात 'करोना' रुग्णांची स्थिती | |
|---|---|---|
| ५८७ दाखल संशयित रुग्ण | ५४१ निगेटिव्ह रुग्ण | ९ उपचार चालू असलेले रुग्ण |
| १,८७३ विलगीकरण केलेले आंतरराष्ट्रीय प्रवासी | २६ चाचणी अहवाल प्रतीक्षा | २,७०,५७७ सर्वेक्षण केलेली घरे |
| २० पॉझिटिव्ह रुग्ण | १२ करोनामुक्त झालेले रुग्ण | ७,४७,२४९ सर्वेक्षण केलेल्या व्यक्ती |

### कडक प्रवेशबंदी असणारा भाग

- घरकुल रेसिडेन्सी : बिल्डिंग क्र. ए - १ ते २० चिखली, (पवार इंडस्ट्रियल परिसर - नेवाळे वस्ती)
- खराळवाडी : जामा मशिदीच्या भोवतीचा परिसर, पिंपरी (शिरमे हॉस्पिटल, ॲप्सन लायब्ररी, क्रिश्ना ट्रेडर्स, वैशाली पार्क सोसायटी-खराळआई गार्डन, ओम हॉस्पिटल, ओरिएंटल बँक, सिटी प्राइड हॉटेल, क्रिस्टल कोर्ट हॉटेल)
- दिघी परिसर : कमलराज बालाजी रेसिडन्सी, रोडे हॉस्पिटलजवळ, दिघी, भोसरी (रोडे हॉस्पिटल - एसव्हीएस कम्प्युटर - स्वरा गिफ्ट शॉपी - साई मंदिर रस्ता - अनुष्का ऑप्टिकल शॉप)
- पडवळनगर, थेरगाव : शिवतीर्थनगर, पडवळनगर थेरगाव (शिरोळे क्लिनिक - गणेश मंदिर - निदान क्लिनिक - कीर्ती मेडिकल - रेहमानिया मशीद - ऑर्किड हॉस्पिटल - अशोका सोसायटी रोडवरील गणपती मंदिर)

### मास्क बंधनकारक

'सील केलेल्या परिसरांच्या हद्दीमध्ये ये-जा करण्यास पुढील आदेशापर्यंत प्रवेशबंदी करण्यात येत आहे. सील केलेल्या परिसरातील प्रत्येक नागरिकाने तोंडाला मास्क अथवा परगुती स्वच्छ धुतलेला कापडी रुमाल लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच आदेशामधील निर्बंधातून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तींना, करोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काम करणारे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे कर्मचारी व वाहने आणि सरकारी सेवा देण्यात येणाऱ्या वाहनांना वगळण्यात आले आहे. या परिसरातील नागरिकांनी सहकार्य करावे,' असे आवाहन महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी केले आहे.

## Mata 27.04.20



**पोलिस बंदोबस्त...**

कुंभारवेसकडून आरटीओ आणि पुणे स्टेशन-जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर कायमच वर्दळ असते. सध्या लॉकडाउनमध्ये हा रस्ता पोलिसांनी पूर्ण बंद केला असून, कोणीही त्याचा वापर करू नये यासाठी बॅरिकेडिंगसह पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**Lokmat 28.04.20**

# शहरातील पोलीस चौक्यांचे कामकाज बंद

**अतिसंक्रमित क्षेत्रात विशेष काळजी : गर्दी होऊ नये, म्हणून उपाययोजना**

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे शहरातील अतिसंक्रमित क्षेत्रात असलेल्या पोलीस चौकांमध्ये नागरिकांची गर्दी होऊ नये, यासाठी या भागातील पोलीस चौक्यांचे कामकाज बंद करून थेट पोलीस ठाण्यातून काम सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

शहरातील मध्यवस्तीमधील एका पोलीस ठाण्यातील चार पोलीस कर्मचाऱ्यांना कोरोना विषाणूची लागण झाली आहे. त्यांच्याशी संपर्कात आलेल्यांना प्रोटोकॉलनुसार क्वारंटाइन करण्यात आले आहे.

शहरातील मध्यवस्तीत मोठ्या संख्येने कोरोनाबाधित रुग्ण आढळून येत असल्याचे हा सर्व परिसर अतिसंक्रमित क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आला आहे. या भागात असलेल्या पोलीस चौक्यांमध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची संख्या कमी असते. तसेच एखादी घटना घडली तर त्याचा परिणाम या चौक्यांमध्ये नागरिकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन तात्पुरत्या स्वरुपात या पोलीस चौक्यांचे काम बंद करण्यात आले आहे.

याबाबत सह पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी सांगितले, की अतिसंक्रमित क्षेत्रात असलेल्या पोलीस ठाण्यामधील पोलीस कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण झाल्याचे लक्षात आल्यावर प्रोटोकॉलनुसार त्यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना क्वारंटाईन करण्यात आले आहे.

या पोलीस ठाण्याच्या परिसरात भवानी पेठेसारखा अतिसंक्रमित भाग येत असल्याने तेथे आवश्यकतेनुसार अधिक मनुष्यबळ उपलब्ध करून दिले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून सर्वच अतिसंक्रमित क्षेत्रातील पोलीस चौक्यांचे काम बंद ठेवण्यात आले असून त्यांचे कामकाज थेट पोलीस ठाण्यातून करण्यात येत आहे. कोरोना विषाणूपासून खबरदारी घेण्यासाठी आवश्यक ती सर्व साधने, साहित्य पोलिसांना उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

### ४५ वर्षावरील पोलिसांना बाधित क्षेत्रात बंदोबस्त नाही

- ४५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेले तसेच ज्यांना दमा, खोकला, सर्दी, रक्तदाब अथवा मधुमेह यापैकी कोणताही आजार असेल अशा पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना कोरोनाबाधित क्षेत्रात काम देऊ नये, असे आदेश शहर पोलीस दलाने काढले आहेत.
- यासंबंधित रविवारी सर्व पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची व्हिडीओ कॉन्फरन्स घेण्यात आली. त्यात मुख्यालयाच्या पोलीस उपायुक्तांनी नाकाबंदीसाठी नेमण्यात आलेले पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचा गट तयार करून हा गट एकत्रितरीत्या कर्तव्य पार पडेल व त्यांना इतर पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांबरोबर ड्यूटी देण्यात येऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



**Lokmat 22.04.20**

# नऱ्हेगावच्या हद्दी केल्या सील

## ड्रोनच्या माध्यमातून रस्त्यावर करडी नजर

लोकमत न्यूज नेटवर्क

धायरी : कोरोनाचा प्रादुर्भाव पुणे शहरातील विविध भागांत वाढत असून, त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून तसेच संचारबंदी कडक करीत सिंहगड रस्त्यावरील नऱ्हे भागातील रस्ते बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आले आहेत. शिवाय ड्रोन कॅमेऱ्याच्या माध्यमातून ग्रामपंचायत प्रशासन रस्त्यावर फिरणाऱ्या नागरिकांवर करडी नजर ठेवून असल्याचे बघावयास मिळाले.

कोरोना विषाणूमुळे संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंध नियंत्रणाबाबत उपाययोजना म्हणून हवेली उपविभागीय दंडाधिकारी यांच्या आदेशानुसार पुढील आदेश येईपर्यंत नऱ्हे गावाच्या हद्दी सील करण्यात आल्या आहेत. त्यानुसार नऱ्हे गावाच्या हद्दीमध्ये पुढील आदेश येईपर्यंत प्रवेशबंदी व गावाच्या हद्दीतून बाहेर पडण्यास नागरिकांना बंदी घालण्यात आल्याचे ग्रामपंचायतीच्या वतीने सांगण्यात आले.

सिंहगड रस्ता परिसरातील नऱ्हे येथील मानाजीनगर, भूमकर पूल या मुख्य रस्त्यावर ग्रामपंचायतचे कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. त्याचबरोबर नऱ्हे परिसरातील इतर रस्ते बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आले आहेत. तसेच ड्रोन कॅमेऱ्याद्वारे विनाकारण रस्त्यावर फिरणाऱ्याविरुद्ध कारवाईचा बडगा सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याच्या मदतीने ग्रामपंचायतीने उचलला आहे. सिंहगड रस्ता परिसरातील अनेक भागातील नागरिकांना होम क्वारंटाईनचे आदेश देण्यात आले होते. त्यापैकी काही जण आता कोरोनाबाधित असल्याचे आढळून आले.

**Lokmat 14.04.20**

# अत्यावश्यक सेवांसाठी डिजिटल पासला मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : लॉकडाऊनच्या काळात अत्यावश्यक सेवांमधून सुट देण्यात आलेल्या व्यक्ती, कंपनी, सेवा ज्यांचे पास १४ एप्रिल २०२० पर्यंत देण्यात आले होते. त्यांचे पास ३० एप्रिल २०२० पर्यंत वाढविण्यात येणार आहे. तसेच १४ एप्रिलच्या मध्यरात्री १२ वाजेपर्यंत ज्यांना काही कारणास्तव पासच्या मुदतवाढीचा मेसेज आला नाही ते पुन्हा अर्ज करु शकतात, असे पोलीस उपायुक्त बच्चनसिंग यांनी कळविले आहे.

या मुदतवाढीमुळे अनेक नागरिकांना दिलासा मिळणार आहे. परंतु, नागरिकांना वेळेमध्ये डिजिटल पास मिळत नसल्याने ते हैराण झाले आहेत. पास त्वरित देण्याची सोय करण्याची मागणी होत आहे.

**Mata 07.04.20**



मंडई परिसरातील लहान गल्ल्याही बंद करण्यात आल्या आहेत.

> मंडई परिसरात जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करण्यासाठी नागरिक गर्दी करत होते. या ठिकाणी सोशल डिस्टन्सिंग पाळले जात नव्हते. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रस्ते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रस्ते बंद केलेल्या भागात काही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास बॅरिकेड काढून रस्ते मोकळे करण्याची काळजी घेण्यात आली आहे.
>
> – दादासाहेब चुडाप्पा, पोलिस निरीक्षक, विश्रामबाग पोलिस स्टेशन

- 'कोरोना'चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मंडईतील अनेक रस्ते बंद.
- मंडईकडे येणारे सर्व रस्ते बॅरिकेडिंग लावून बंद.
- [illegible]
- [illegible]

**Mata 08.04.20**





**Lokmat 21.04.20**

# संपूर्ण पुण्यात अधिक कडक निर्बंध

लोकमत न्यूज नेटवर्क

### बँका ३ तास उघड्या राहणार

### ई-कॉमर्सवर बंधने



डिस्टन्सिंगचा बोजवारा :

**Prabhat 08.04.20**



**पुणे स्टेशन :** पुण्याचा पूर्व भाग सील केला आहे. त्यामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त आहे. शिवाय, नागरिकांची कसून चौकशी करण्यात येत आहे.

**Lokmat 12.04.20**

# ...अरे हे इतके समजदार कसे?

## आम्हालाही पडला प्रश्न । पोलीस उपायुक्त सुहास बावचे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव शहरात विशेषत: मार्केट यार्ड परिसरात वाढत असताना तेथील गर्दीवर कसे नियंत्रण ठेवायचे, हा आमच्यापुढे प्रश्न होता. सुरुवातीला तिथे लोक अक्षरश: भाजी घेण्यासाठी तुटून पडत होते. त्यामुळे त्यांना सोशल डिस्टन्सिंग कसे करायला लावायचे, हा मोठा प्रश्न होता; पण तेथे येणारे शेतकरी, काम करणारे मजूर हे तसे कमी शिकलेले, तरी त्यांना आम्ही चार गोष्टी सांगितल्या, तर त्या त्यांनी लगेच आत्मसात केल्या. येताना हात धुवून येणे, तोंडाला रुमाल किंवा मास्क सर्व जण लावत होते. दुसरीकडे ताजी भाजी खरेदी करायला येणाऱ्यांना मात्र काही धरबंध नव्हता. त्यामुळे आम्हालाच अनेकदा प्रश्न पडला की नेमके सुशिक्षित कोण? आणि हे इतके समजदार कसे..?

कोरोना विषाणूशी लढताना गेले काही दिवस रात्र बंदोबस्तात असणारे पोलीस उपायुक्त सुहास बावचे सांगत होते.

पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांच्या परिमंडळात कोरोना विषाणूचे रुग्ण अधिक सापडले आहेत. कोंढवा, मिठानगर, मार्केट यार्ड अशा अतिशय दाट व मिश्रवस्ती असलेल्या भागात सध्या कर्फ्यू सुरु आहे. गेले १५ दिवस ते १२ तासांहून अधिक काळ रस्त्यावर असतात. लॉकडाऊनविषयी बावचे यांनी सांगितले की, मार्केट यार्डमध्ये लोक ताजी भाजी घेण्यासाठी इतके तुटून पडत असलेले पाहून विचित्र वाटत होते. जणू भाजीशिवाय त्यांचे काहीच चालू शकणार नाही. भाजी काही तुमचे सर्वस्व होऊ शकत नाही; पण हे लोकांना पटत नव्हते. तेव्हा सोशल डिस्टन्सिंग नियोजनबद्ध राबविले. त्याला शेतकरी, मजूर यांनी चांगली साथ दिली. तेव्हा कितीही गर्दी येऊ दे, त्यांना शिक्षित केले तर त्यावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य आहे, याचा आत्मविश्वास मनाला सुखावून गेला. इतर ठिकाणचे बाजार बंद झाले असताना पुण्यातील बाजार उशिरापर्यंत चालू राहू शकला.

कोंढवा, मिठानगर भागात सध्या कर्फ्यू चालू आहे. अशा दाट वस्तीमध्ये अंमलबजावणी करणे खूपच अवघड असते; पण त्या भागात कोरोनाचे संशयित सापडल्याने आधीच भीतीचे वातावरण होते. त्यांना समजावून सांगितल्यावर लोकांनीच आपणहून कर्फ्यूची अंमलबजावणी स्वत:हून केली आहे. आज कोंढव्यात लॉकडाऊन कसे होऊ शकते, हे पाहण्यासारखे आहे.






**घरी जाताना** पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना आपण अंगावर हा विषाणू तर घेऊन जात नाही ना, अशी भीती असायची. माझ्या शेतीतील ज्ञानाचा आधार घेऊन आम्ही सॅनिटायझर टनेल तयार केला आहे. सकाळी कामावर येताना आणि परत घरी जाताना या टनेलमधून जायचे. त्यातून घरी जाताना आपण सुरक्षित आहोत, ही भावना पोलिसांमध्ये निर्माण झाली. हे मानसिक समाधान कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास टिकविण्यासाठी महत्त्वाचा आहे.

**28.04.20**

# Police to check cleanliness in public toilets

**Pune:** The city police now have the added responsibility of checking the cleanliness in public toilets in the slum pockets, besides enforcing the lockdown rules.

The beat marshals inspect the public toilets twice a day to check for cleanliness. If found unclean, they summon the Pune Municipal Corporation's conservancy staffers and get it sanitised to contain the spread of the contagion among the slum dwellers in Dais Plot, Gultekdi, Kasewadi-Bhavani Peth, Mangalwar Peth, Yerawada, Shivajinagar and Parvati.

"No one is being allowed to come near the PMC staffers while they are cleaning the toilets," a senior police officer said. TNN

**Loksatta 01.05.20**

# करोनाबाधित भागात रविवारपर्यंत निर्बंध

## दूध उपलब्ध; भाजीपाला, किराणा माल दुकाने बंद




लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : करोनाच्या संसर्गाला अटकाव घालण्यासाठी प्रशासन तसेच पोलिसांनी करोनाबाधित भागात लागू केलेले निर्बंध येत्या रविवारपर्यंत (३ मे) कायम राहणार आहेत. या भागात फक्त दूध सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत उपलब्ध होणार असून भाजीपाला, किराणा तसेच जीवनावश्यक वस्तूंची दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत.

करोनाबाधित भागातील रुग्णांची संख्या तसेच संसर्गाचे वाढते प्रमाण पाहता यापूर्वी लागू करण्यात आलेले कडक निर्बंध ३ मेपर्यंत कायम राहणार आहेत, अशी माहिती सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी दिली.

**नागरिकांना अडचण आल्यास संपर्क साधा**

करोनाबाधित भागात कडक निर्बंध घालण्यात आले असून नागरिकांना या काळात काही समस्या तसेच अडचण आल्यास त्वरित पोलीस नियंत्रण कक्षाशी (दूरध्वनी क्रमांक-१००) संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

संचारबंदी, वाहतूकबंदीची अंमलबजावणी कडक करण्यात येणार आहे. करोनाबाधित भागातील दूधविक्री केंद्रे सकाळी १० ते दुपारी १२ यावेळेत खुली राहणार आहेत. घरपोच दूध वितरण सेवा देणाऱ्यांसाठी सकाळी १० ते सायंकाळी ६ अशी वेळ निश्चित करण्यात आली आहे. दुधाच्या वाहतुकीवर कोणतेही निर्बंध घालण्यात आले नाहीत. नागरिकांनी प्रशासन तसेच पोलिसांना सहकार्य करावे. पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन डॉ. शिसवे यांनी केले आहे.

**पुढील भागात निर्बंध**

कडक निर्बंध घालण्यात आलेला शहरातील भाग पुढीलप्रमाणे- समर्थ, खडक, फरासखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पेठा (कसबा पेठ, मंगळवार पेठ, सोमवार पेठ, रास्ता पेठ, नाना पेठ, भवानी पेठ, घोरपडे पेठ, खडकी पोलीस ठाण्यातील पाटील इस्टेट, इराणी वस्ती परिसर), स्वारगेट पोलीस ठाण्यातील गुलटेकडी, महर्षीनगर, डायस प्लॉट, इंदिरानगर, खड्डा झोपडपट्टी, लष्कर पोलीस ठाण्यातील नवीन मोदीखाना, पूना कॉलेज रस्ता, मोदीखाना, भीमपुरा, बाबाजान दर्गा, छत्रपती शिवाजी मार्केट, बंडगार्डन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ताडीवाला रस्ता भाग, सहकारनगर पोलीस ठाण्यातील तळजाई वसाहत, बालाजीनगर भाग, दत्तवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पर्वती दर्शन परिसर, येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लक्ष्मीनगर, गाडीतळ परिसर.

**Lokmat 01.05.20**

**तीन दिवस कडक अंमलबजावणी : पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांचे आदेश**

# अतिसंक्रमणाच्या भागात जीवनावश्यक वस्तूही बंद

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी शहराच्या वेगवेगळ्या भागांत कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यापुढील काळात शहरातील जो भाग कोरोना अतिसंक्रमणशील म्हणून घोषित केला आहे, त्या भागात शुक्रवारी (दि. १ मे) सकाळी ६ पासून 'अतिरिक्त मनाई' आदेश पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी दिले आहेत. या आदेशानुसार १ मे रोजी सकाळी सहापासून ते ३ मेच्या रात्री बारापर्यंत अतिरिक्त निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्यात दूधविक्री सकाळी दहा ते बारा व घरपोच दूध वितरण सेवा सकाळी सहा ते दहा वेळेत सुरू राहणार असून, इतर सर्व जीवनावश्यक वस्तूंची विक्री केंद्रे, दुकाने व वितरण सेवा पूर्णपणे बंद राहणार आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत चालला असून तो थांबविण्यासाठी तसेच परिस्थिती आणखी हाताबाहेर जाऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनाकडून कठोर पावले उचलली जात आहेत. म्हणून वेगवेगळे आदेश काढून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे. गुरुवारी काढण्यात आलेल्या आदेशात काही कडक निर्बंध घालण्यात आले आहेत. यात रुग्णालय, अत्यवस्थ रुग्णांची वाहतूक तसेच औषधालये यांना सूट देण्यात आली आहे. कोरोना प्रतिबंधित क्षेत्रामध्ये जीवनावश्यक सेवा (किराणा माल, भाजीपाला, फळे, चिकन, मटण, अंडी) यांची विक्री केंद्रे, दुकाने, वितरण सेवा पूर्णपणे बंद राहील. दुधाच्या वाहतुकीसाठी कुठलेही निर्बंध नाहीत. शासकीय अन्नधान्य वितरण कार्यालय यांच्याकडून चालू असलेल्या कार्यवाहीसाठी हे निर्बंध लागू होणार नाहीत. गुरुवारी दुपारनंतर हा आदेश जारी करण्यात आला. त्यामुळे ज्या नागरिकांकडे काही वस्तू नसतील, त्यांना आता तीन दिवसांनंतरच त्या घ्याव्या लागतील. कारण आज सकाळी किराणा माल घेण्याची वेळ संपली. त्यानंतर हा आदेश आला. नागरिकांना असा आदेश जारी होणार आहे, असे अगोदर समजले असते तर नागरिकांना आवश्यक वस्तू घेता आल्या असत्या; पण आता तीन दिवस काही नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे.

**या भागात असेल हा आदेश लागू ...**

- समर्थ पोलीस ठाणे संपूर्ण कार्यक्षेत्र, खडक पोलीस ठाणे, फरासखाना पोलिस ठाणे (कसबा पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, रास्ता पेठ, शहरातील सर्व पेठ परिसर)
- गुलटेकडी, महर्षीनगर झोपडपट्टी परिसर, डायस प्लॉट, इंदिरानगर, खड्डा झोपडपट्टी
- नवीन मोदीखाना, पूना कॉलेज रोड, मोदीखाना कुरेशी मशिदीजवळच्या परिसर, भीमपुरा लेन, बाबाजान दर्गा, क्वार्टर गेट रोड, शिवाजी मार्केट, सरबतवाला चौक, शीतलादेवी मंदिर रोड,
- ताडीवाला रोड, तळजाई वसाहत, बालाजीनगर
- पर्वती दर्शन परिसर, लक्ष्मीनगर, गाडीतळ, चित्रा चौक परिसर,
- पाटील इस्टेट झोपडपट्टी, इराणी वस्ती, पाटकर प्लॉट



भवानी पेठेत आता कडकडीत बंद ठेवण्यात आला असून, ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त आहे.

**Pudhari 03.05.20**

कात्रज चौकात कडक बंदोबस्त....



**Sakal 01.05.20**



**Pudhari 16.05.20**



**Loksatta 26.05.20**

# संचारबंदीत विमान तिकीट पोलीस परवाना म्हणून ग्राह्य

## विमान प्रवाशांना पोलीस परवान्याची गरज नाही

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : देशाअंतर्गत विमान प्रवासी सेवा सुरू झाल्यानंतर शहरातून विमानाने परगावी जाणाऱ्या प्रवाशांकडे असलेले विमान तिकीट (बोर्डिंग पास) ग्राह्य धरले जाणार आहे. त्यासाठी पुणे पोलिसांकडून शहरात संचार करण्यासाठी दिल्या जाणारा डिजिटल परवाना विमान प्रवाशांना बाळगण्याची गरज नसल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त बच्चन सिंह यांनी सोमवारी दिली.

गेले दोन महिने देशाअंतर्गत विमान सेवा बंद होती. त्यामुळे अनेक जण शहरात अडकून पडले होते. रेल्वे सेवा, विमान सेवा बंद असल्याने



बाहेरील राज्यातून आलेल्या अनेकांना गैरसोयीला सामोरे जावे लागले होते. २५ मार्च रोजी देशाअंतर्गत विमान सेवा बंद करण्यात आली. देशाअंतर्गत विमान सेवेला परवानगी दिल्यानंतर शहरात अडकून पडलेल्या अनेकांची सोय झाली. शहरात संचार करण्यासाठी पुणे पोलिसांकडून डिजिटल परवाना दिला जातो. अत्यावश्यक सेवा तसेच वैद्यकीय उपचारांसाठी प्राधान्याने हा परवाना देण्यात येतो. हा परवाना असल्यास नागरिकांना अडवले जात नाही.

याबाबत पोलीस उपायुक्त सिंह म्हणाले, विमानसेवेला परवानगी दिल्यानंतर अनेक जण विमानाने दिल्ली, चेन्नई, बंगळुरु तसेच देशातील अन्य शहरात रवाना होऊ लागले आहे. शहरात फिरण्यासाठी डिजिटल परवान्याची गरज आहे. मात्र, विमान प्रवाशाकडे तिकीट असल्यास ते बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांना दाखवावे. विमान तिकीट असल्यास प्रवाशांची अडवणूक होणार नाही. विमान तिकीट डिजिटल परवाना म्हणून ग्राह्य धरला जाणार आहे.

**Lokmat 05.05.20**

**पोलीस आयुक्तांचा इशारा : नाही तर अडीच हजारांचा बाँड**

# दारु खरेदीसाठी चालावे लागणार

लोकमत न्यूज नेटवर्क


पुणे : शहरात दारू विक्री सुरु असताना गर्दी होऊ नये, ही संबंधित दुकानदाराची जबाबदारी असणार आहे. तसे झाले नाही तर कायदेशीर कारवाई होणार आहे. सगळ्या महत्त्वाचे म्हणजे दारु खरेदीसाठी घराजवळच्या वाईन शॉपमध्ये पायी चालत जावे लागणार आहे. तुम्ही वाहन घेऊन येऊ शकत नाही. जर तुम्ही विना पासचे दारु खरेदीसाठी वाहन घेऊन गेला तर तुमचे वाहन जप्त केले जाईल. त्याचबरोबर त्यांच्याकडून सिक्युरिटी बाँड म्हणून अडीच हजार रुपये घेतले जातील.

पुण्यातील लॉकडाऊनमधील बंधने शिथिल केल्यानंतर वाईन शॉप सुरु झाली. दारु खरेदीसाठी आज पहाटेपासूनच शहरातील सर्वच दुकानांवर मोठी गर्दी झाली होती. काही ठिकाणी तर इतकी गर्दी झाली की शेवटी वादावादी होऊ लागल्याने पोलिसांनी इच्छुक मद्यपींना काठीचा प्रसाद द्यावा लागला. या सर्व प्रकारानंतर दुपारनंतर शहरातील दुकाने बंद करावी लागली. त्यानंतर आता पोलीस आयुक्तांनी ट्विट करुन दारु खरेदी करणाऱ्यांना एक इशारा दिला आहे. तसेच स्वतंत्र नियमावली जाहीर केली आहे. दिवसभराच्या गोंधळानंतर पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी ट्विट करुन नियम पाळण्याचे आदेश दिले आहेत.

१) १४४ कलमानुसार प्रत्येक विक्रीच्या ठिकाणी फिजिकल डिस्टन्सिंग पाळावे लागणार

२) फिजिकल डिस्टन्स पाळणे हे दुकानदाराची जबाबदारी आहे. ते झाले नाही तर कारवाई करण्यात येणार

३) टोकन देऊन वेळेनुसार खरेदीसाठी बोलवावे.



४) सॅनिटायझरची व्यवस्था करावी.

५) दारु खरेदीसाठी पोलिसांनी दिलेल्या वेळेत आणि पायीच जायचे आहे.

६) संसर्गित भाग वगळता इतर भागात कामाला जाणाऱ्या कामगारांना एकट्याने जाण्यास परवानगी नसून त्यांनी एकत्रित डिजिटल पासची परवानगी घ्यायची आहे.

**Loksatta 16.05.20**

# शहरात केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाची तुकडी दाखल

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : टाळेबंदीत सलग दोन महिने बंदोबस्तात गुंतलेल्या पोलिसांवरील ताण हलका करण्यासाठी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) तुकड्यांना राज्यात पाचारण करण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर 'सीआरपीएफ'ची एक तुकडी शहरात दाखल झाली.

शहरात कायदा आणि सुव्यवस्था



राखण्यासाठी 'सीआरपीएफ'ची तुकडी पोलिसांना साहाय्य करणार आहे. एका तुकडीत १० अधिकारी आणि ११० जवान आहेत. 'सीआरपीएफ'ची तुकडी शहराच्या काही भागातून संचलन करणार आहे. शहरातील ६९ प्रतिबंधित भागातून जाणाऱ्या प्रमुख मार्गावर 'सीआरपीएफ'ची तुकडी संचलन करणार आहे. ज्या भागात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, त्या भागातील कायदा आणि सुव्यवस्था हाताळणाऱ्या पोलिसांना 'सीआरपीएफ'ची तुकडी साहाय्य करणार आहे.

राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केंद्र सरकारकडे बंदोबस्तासाठी 'सीआरपीएफ'च्या २० तुकड्यांची मागणी केली होती. त्यानुसार शहरात 'सीआरपीएफ'ची एक तुकडी शहरात दाखल झाली.

**Prabhat 07.05.20**

## विनाकारण फिरणाऱ्यांची वाहने जप्त...



डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्ता : रस्त्यांवर वाहनांची वर्दळ वाढत आहे. त्यामुळे पोलिसांकडून विनाकारण फिरणाऱ्यांवर कारवाई करण्यात येत असून वाहने जप्त करण्यात येत आहे.

**Mata 12.05.20**

# लष्कर परिसरात कठोर पावले

## औषधविक्री फक्त चालू राहणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोनाचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी पुणे कँटोन्मेंट बोर्डाने पुन्हा एकदा संचारबंदीच्या मात्रेवर भर देऊन लष्कर परिसरात १२ ते १४ मे दरम्यान पूर्णपणे लॉकडाउन पाळण्याची घोषणा केली आहे. या कालावधीत केवळ औषधविक्रीची दुकाने सकाळी १० ते १ आणि सायंकाळी ५ ते ८ या वेळेत खुली ठेवण्याची परवानगी असून, उर्वरित सर्व दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत.

बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमितकुमार यांनी या संदर्भातील जाहीर नोटीस सोमवारी दुपारी प्रसिद्ध केली.

लष्कर परिसरात करोनाचा प्रसार गेल्या काही दिवसांत झपाट्याने वाढत आहे. विशेषतः न्यू मोदीखाना, भीमपुरा आणि आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात करोनाबाधित रुग्ण आढळून येत आहेत. त्यामुळे या परिसरात लॉकडाउनची काटेकोर अंमलबजावणी गरजेची आहे. त्या पार्श्वभूमीवर विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधित आणि सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्रात लॉकडाउनचे निर्बंध कठोरपणे लागू करण्यात येणार असून, केवळ औषधविक्रीची दुकाने सकाळी आणि सायंकाळी तीन तास खुली राहणार असून, उर्वरित सर्व दुकाने आणि व्यवहार बंद ठेवण्यात येणार आहेत. पोलिसांच्या मदतीने या लॉकडाउनची अंमलबजावणी करण्यात येणार असून, नागरिकांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन बोर्डाने केले आहे.



संग्रहित छायाचित्र

### दुपारपासूनच अंमलबजावणी

करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी बोर्डाने शनिवारी आणि रविवारी कँटोन्मेंट हद्दीत कडकडीत लॉकडाउन लागू केला होता. कँटोन्मेंटवासीयांनीही त्याला प्रतिसाद देऊन सर्व व्यवहार बंद ठेवले होते. सोमवारी सकाळपासून किराणा, भाजीपाल्यासह अत्यावश्यक वस्तू विक्रीची दुकाने खुली ठेवण्यात आली होती. मात्र, पुन्हा लॉकडाउनची घोषणा होण्याची शक्यता असल्याने लष्कर परिसरातील नागरिकांनी किराणा, दूध, भाजीपाला भरून घेतला. त्यानंतर बोर्डातर्फे लॉकडाउनची घोषणा करून सोमवारी दुपारपासूनच अंमलबजावणी सुरू करण्यात आली. त्यामुळे लष्कर परिसरातील दुकानांचे शटर आता गुरुवारनंतरच उघडणार आहेत. करोनाच्या वाढत्या प्रसाराला रोखण्यासाठीच लॉकडाउनची अंमलबजावणी केली जात असल्याचे बोर्डाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गजभिये यांनी सांगितले.

**Lokmat 04.05.20**

# विशेष पोलीस अधिकारी यांचे वानवडीत पथसंचलन

लोकमत न्यूज नेटवर्क

वानवडी : कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे वानवडीत नागरिकांनी घराबाहेर पडू नये व फिजिकल डिस्टन्सिंगचे पालन व्हावे या उद्देशाने पोलिसांकडून 'विशेष पोलीस अधिकारी' यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या नियुक्त केलेल्या 'विशेष पोलीस अधिकारी' यांचे वानवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील यांच्या पूर्वसूचनेनुसार वानवडीतील मुख्य शिवरकर रस्त्यावर पथसंचलन करण्यात आले.

रविवारी संध्याकाळी पाच वाजता वानवडी पोलिसांनी नियुक्त करून दिलेल्या कोविड फायटर 'विशेष पोलीस अधिकारी' व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून प्रतिभानगर चौक ते संविधान चौकापर्यंत पथसंचलन करण्यात आले. पथसंचलन दरम्यान नागरिकांनी विनाकारण रस्त्यावर फिरू नये, तसेच मास्क लावणे, सोशल डिस्टन्सिंगचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी वानवडी बाजार व भैरोबानाला पोलीस चौकीच्या अंतर्गत नियुक्त केलेले 'विशेष पोलीस अधिकारी' व पोलीस उपनिरीक्षक भूषण पोटावडे, नरेश बाडेवाले, सहा. पोलीस निरीक्षक भगवान कांबळे व पोलीस कर्मचारी यांचाही सहभाग होता.

- संचलन संपल्यावर पोलीस गणेश खरात यांनी 'विशेष पोलीस अधिकारी' यांना मार्गदर्शन सूचना केल्या. तसेच वानवडी पोलीस ठाणे व 'विशेष पोलीस अधिकारी' यांच्यात सुसूत्रता आणण्यासाठी अशा प्रकारचे पथसंचलन रोज वानवडीमधील विविध भागांत करण्यात येणार असल्याचे वानवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक क्रांतिकुमार पाटील यांनी 'लोकमत'शी बोलताना सांगितले.

**Prabhat 07.05.20**

# बँकांसाठी पोलिसांकडून नियमावली

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ६ -** लॉकडाऊन तीनमधील काही अटी शिथिल करून काही व्यवसायांसह इतर सेवांना सशर्त परवानगी दिली आहे. त्यामध्ये बँका सुरू करताना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणत्या नियमांचे पालन करावे याबाबत एक नियमावली पोलिसांकडून जारी करण्यात आली आहे. त्यामध्ये अतिसंक्रमणशील क्षेत्र व अतिसंक्रमणशील क्षेत्र वगळून अशी नियमावली आहे.

अतिसंक्रमणशील क्षेत्रातील सर्व बँकांना त्यांच्या शाखा बंद ठेवाव्या लागणार आहेत. मात्र,




त्यांना त्यांची एटीएम सेंटर चालू ठेवता येणार आहेत. अपरिहार्य कारणे, शासकीय अनुदान यासंबंधीत कामकाजासाठी शासनाच्या आदेशाचे पालन व्हावे, असादेखील उल्लेख आहे. तर संक्रमनशील क्षेत्रातील वरील भाग वगळता इतर (नॉन कन्टेन्मेंट परिसर)मधील बँक ग्राहकांसाठी सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत सुरू राहतील. त्यानंतर दुपारी २ ते ५ पर्यंत अंतर्गत कार्यालयीन कामकाजासाठी कर्मचाऱ्यांना बँका सुरू ठेवता येतील.

कर्मचाऱ्यांची संख्या मर्यादीत ठेवण्यासाठी उपलब्ध मनुष्यबळाच्या ५० टक्के कर्मचारी कामावर हजर राहू शकतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नॉन कन्टेन्मेंट क्षेत्रामधील शाखेत काम करणारे अधिकारी व कर्मचारी हे कन्टेन्मेंट क्षेत्रामध्ये वास्तव्यास असणारे नसावेत. दरम्यान, ज्यांच्याकडून नियमांचे उल्लंघन होईल त्यांच्यावर कमल १८८ नुसार कारवाई होणार आहे.

### असे असणार नियम

- बँक परिसरात गर्दी टाळण्यासाठी खासगी व मान्यताप्राप्त सुरक्षारक्षक नेमणे बंधनकारक.
- आरोग्यविषयक सर्व खबरदारीच्या उपायांचे काटेकोर पालन करणे अनिवार्य.
- बँक आस्थापना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सायंकाळी ७ पर्यंत वास्तव्याच्या ठिकाणी पोहचणे.
- बँक प्रशासनाने कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीच्या आदेशाची प्रत संबंधीत कर्मचाऱ्यांना द्यावी.
- सर्व संबंधितांनी अधिकृत ओळखपत्र व आदेशाची प्रत जवळ बाळगावी.

**अतिसंक्रमणशील क्षेत्रातील सर्व बँकांच्या शाखा बंद राहणार**

**इतर ठिकाणी सकाळी १० ते दुपारी २ पर्यंत ग्राहकांसाठी तर, दुपारी २ ते ५ अंतर्गत कार्यालयीन कामकाजासाठी वेळ**

**Prabhat 12.05.20**

## करोनाबाधितांच्या वाढत्या संख्येनंतर पाऊल

# लष्कर भागात कडेकोट टाळेबंदी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ११ -** कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीत करोना प्रादुर्भाव वेगाने पसरत आहे. परिसरातील न्यू मोदीखाना पाठोपाठ भीमपुरा भागात बाधितांची संख्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर लष्कर परिसरात लॉकडाऊनची कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे. १४ मेपर्यंत लष्कर परिसरात कठोर लॉकडाऊन पाळला जाणार आहे.

पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड परिसरात सकाळी १० ते दुपारी १



आणि सायंकाळी ५ ते ८ या वेळेत फक्त औषध दुकानेच खुली असतील. नागरिकांनी लॉकडाऊनचे काटेकोरपणे पालन करून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमितकुमार यांनी केले आहे. लष्कर परिसरात बांबू, जाळ्यांनी बंद केलेले गल्लीबोळ, औषध विक्रीची दुकाने वगळता अन्य दुकानांचे शटरडाऊन, शिवाजी मार्केटसह प्रमुख बाजारपेठांच्या परिसरात सामसूम अन रस्त्यांवर तुरळक रहदारी असे चित्र सध्या कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या परिसरात पाहावयास मिळत आहे.

दरम्यान, बोर्डाच्या सरदार वल्लभभाई पटेल रुग्णालय-५७ आणि महादजी शिंदे हायस्कूलमधील करोना वॉर्डमध्ये आजअखेर ५३ रुग्णांवर उपचार सुरू आहेत, अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.

### 'डब्लूएचओ' समन्वयकांकडून पाहणी

जागतिक आरोग्य संघटनेचे (डब्लूएचओ) राज्य समन्वयक डॉ. कमलाकर अर्जुनलष्करे यांनी सरदार पटेल रुग्णालयाला भेट देत सुविधांची पाहणी केली. यात रुग्णालयातील खाटांमधील अंतर, बेडशीट, ब्लँकेटची गुणवत्ता, मास्क, व्हेंटिलेशन आदी वस्तू डब्लूएचओच्या मानकांनुसार तपासून रुग्णालयाचे काम समाधानकारक असल्याचे सांगितले आहे, असे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. विद्याधर गायकवाड यांनी स्पष्ट केले.

**Prabhat 23.05.20**

# पुणेकरांनो,
# सातच्या आत घरात!

## संचारबंदी लागू : गुन्हे दाखल होणार

**प्रभात वृत्तसेवा**



**पुणे, दि. २२ -** शहरात लॉकडाऊनचे निर्बंध काहीसे शिथिल झाले असले, तरी दररोज सायंकाळी ७ ते सकाळी ७ दरम्यान संचारबंदीचे आदेश दि. ३१ मेपर्यंत कायम राहणार आहेत, अशी माहिती सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी दिली.

देशभरात टाळेबंदीचा कालावधी वाढविण्यात आला आहे. पण, त्यात सरकारने दुकाने तसेच अन्य व्यवसाय नियम पाळून सुरू ठेवण्यास मुभा दिली आहे. लॉकडाऊनच्या चौथ्या टप्प्यात पुणे महानगरपालिकेचे क्षेत्र, खडकी, लष्कर भागातील छावणी क्षेत्रात हे संचारबंदी आदेश लागू राहणार आहेत, असे डॉ. शिसवे यांनी म्हटले आहे.

या आदेशाप्रमाणे कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर व गल्लोगल्ली सायकल, दुचाकीसह कोणत्याही वाहनांचा वापर तसेच यातून प्रवास करण्यास तसेच रस्त्यावर फिरणे, उभे राहणे, रेंगाळण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशाचा भंग करणारा व्यक्ती साथरोग अधिनियम आणि भारतीय दंड विधान संहितेनुसार शिक्षेस पात्र असणार आहे.

**Prabhat 12.05.20**

## सीआरपीएफ जवानांचे पथसंचलन...



येरवडा : केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या ९० जवानांनी (सीआरपीएफ) येरवडा गाडीतळ, चित्रा चौक, राज चौक, लक्ष्मीनगर, पर्णकुटी पायथा या परिसरात, येरवडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनूस शेख, पोलीस निरीक्षक गुन्हे अजय वाघमारे आणि कर्मचाऱ्यांनी पथसंचलन केले.

# प्रतिबंधनात्मक उपाय

**Prabhat 27.05.20**



पुणे : झील कॉलेजच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी तयार केलेले काही मास्क पोलीस कर्मचारी यांना देण्यात आले.

## पुन्हा वापरता येऊ शकणाऱ्या मास्कची निर्मिती

**'झील'च्या विद्यार्थ्यांचे यश**

पुणे, दि. २६ - झील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागाचे निखिल चोंदे आणि जेबीन पनीकर या आजी-माजी विद्यार्थ्यांनी 'मेक इन इंडिया', 'स्टार्ट अप इंडिया' या अभियानांतर्गत पुन्हा वापरता येईल, अशा मास्कची निर्मिती केली. '३-डी इन्साईस' या कंपनीमार्फत त्यांनी हे मास्क बनवले आहे.

हे मास्क अन्न आणि औषध क्षेत्रामध्ये वापरण्यात येणाऱ्या रिसायकल्ड प्लॅस्टिकपासून बनवले आहे. त्यामधील फिल्टर हा जिएसएम कॉटनच्या तीन थरांपासून बनला आहे. हे मास्क गरम पाण्यातदेखील स्वच्छ करता येऊ शकतो. तसेच, फिल्टरदेखील गरजेनुसार बदलता येऊ शकतो. या मास्कमुळे आतून हवेची पोकळी निर्माण झाल्याने बाहेरील हवा फक्त फिल्टरमधून आत येऊ शकते. सुरुवातीचे काही मास्क ३-डि इन्साईसमार्फत पोलीस कर्मचारी आणि सफाई कर्मचारी यांना मोफत वाटण्यात आले. हे मास्क तयार करताना संस्थेचे सचिव प्रा. जयेश काटकर, कार्यकारी संचालक प्रदीप खांदवे, प्राचार्य डॉ. अजित काटे आणि मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा. अयुब तांबोळी यांचे मार्गदर्शन मिळाल्याचे अक्षय बामनोटे यांनी सांगितले.

**Prabhat 23.05.20**



कात्रज : पोलीस आणि शीघ्र कृतिदलातील जवानांनी परिसरात संचलन केले.

## पोलीस, शीघ्र कृतिदलाचे कात्रज परिसरात संचलन

कात्रज, दि. २२ (प्रतिनिधी) - करोना पार्श्वभूमीवर लॉकडाऊन सुरू असताना पोलीस प्रशासनासोबत शीघ्र कृतिदलाने नागरिकांचे मनोधैर्य वाढवण्याच्या उद्देशाने, आज कात्रज परिसरामध्ये एकत्र पथसंचलन करण्यात आले. सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथून कात्रज परिसरातील कात्रज गावठाण, संतोष नगर, भगवा चौक परिसर, मस्जिद परिसर, दत्तनगर चौक मार्ग, शनिनगरपर्यंत पथसंचलन करण्यात आले. यावेळी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथील सर्व अधिकारी कर्मचारी यांच्यासोबत शीघ्र कृतिदलाच्या दोन तुकड्या पथसंचलनात सहभागी होत्या. या संचलनात वेळी कात्रज परिसरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सोशल डिस्टन्स ठेवत रस्त्याच्या बाजूने उभे राहून टाळ्या वाजवून या पथसंचलनाचे स्वागत केले.

**Prabhat 06.05.20**

## सात वाइन शॉपवर हडपसरमध्ये गुन्हा

**लॉकडाऊनचे नियम पाळले नाहीत**

पुणे, दि. ५ (प्रतिनिधी) - हडपसर परिसरातील सात दारूच्या दुकानांवर नियमांचे पालन न केल्यामुळे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा आणि महाराष्ट्र कोविड उपाय योजनांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. राज्य सरकारने सोमवारपासून (दि. ४) दारूची दुकाने चालू करण्यासाठी परवानगी दिली असली तरी काही अटी लागू केल्या आहेत. करोना सुरक्षेच्या दृष्टिने अनेकांनी आवश्यक त्या सूचनांचे पालन केले नाही. यामुळे पोलिसांनी कुणाल वाइन, अजिंठा वाइन, राजधानी वाइन, एम. आर. वाइन, एशियन वाइन, एस. एस. फुले वाइन आणि रोहित वाइन या दुकानांवर गुन्हे दाखल केले, असे हडपसर पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, लॉकडाऊनमध्येही बीयर शॉपी उघडण्यासही सरकारने सशर्त परवानगी दिली आहे. दारू खरेदीसाठी नागरिकांकडून ठिकठिकाणच्या बीयर शॉपीसमोर मोठ्या प्रमाणात गर्दी केली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी सर्व बीयर शॉपी मालकांना नोटीस देऊन सुरक्षिततेचे नियम पाळण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतरही गर्दी झाली तर कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी दिला आहे. दारू विक्रीसाठी टोकन सिस्टीम राबविण्यात यावी, अशी सूचना संबंधित दुकानदारांना करण्यात आली आहे. तसेच, ग्राहकांना सॅनिटायझर उपलब्ध करून देण्यात यावे, असे आदेश देण्यात आले आहेत. त्यानंतरही बीयर शॉपी समोर गर्दी झाल्यास संबंधित बीयर शॉपी मालक आणि ग्राहक अशा दोघांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. दारू खरेदीसाठी बाहेर पडणाऱ्यांनी वाहनाचे पास काढणे आवश्यक आहे. पासशिवाय वाहन चालवल्यास कारवाई केली जाणार आहे.

**Prabhat 13.05.20**

**निवडक**



पुणे : दत्तवाडी पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी वाहनांवर करोना विषाणूची प्रतिकृती साकारली आहे. यातून 'संसर्ग रोखण्यासाठी सर्वांनी घरी रहा' असा संदेश देण्यात येत आहे.

**Prabhat 13.05.20**

**प्रतिबंधित क्षेत्रात कडक बंदोबस्त...**



**Pudhari 20.05.20**



**कोरोनायन**

**क्वारंटाईन सेंटरची संख्या वाढवा**

## कोरोना कामामुळे पोलिसांवर प्रचंड ताण

**धोक्याच्या स्थितीत बारा-बारा तास रस्त्यावर**

**पुढारी वॉच**

**Pudhari 19.05.20**

## सण, जयंतीसाठी एकत्र येण्यास मनाई

**कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने पुणे पोलिस आयुक्तालयाचे आदेश**

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन ३१ मे पर्यंत वाढविण्यात आल्यानंतर या महिन्यात मुस्लिम धर्मीयांचा रमजान ईद, तसेच महाराणा प्रताप जयंती, स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती तसेच अहिल्याबाई होळकर जयंतीवेळी शहरात दरवर्षी विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक येतात. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अशा समारंभ आणि सणाप्रसंगी एकत्र येण्यास मनाई आदेश पुणे पोलिस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी काढले आहेत.

Preventive Measures

**Prabhat 31.05.20**

# पोलिसांपुढील आव्हान कडवे

प्रत्यक्ष रस्त्यावर पोलीस अधिकारी आणी कर्मचाऱ्यांनी करोना विषाणूचे संक्रमण रोखण्यासाठी चार हात करत आहेत. त्यांना अनेकदा नागरिकांचा रोषही पत्करावा लागला. प्रत्येक वेळी येणारे वेगवेगळे आदेश आणि नियमांची अंमलबाजवणी करत आहेत. प्रत्यक्षात रस्त्यावर कायदा सुव्यवस्था संभाळण्याचे काम करणाऱ्या खाकी वर्दीला सर्वाधिक धोका असणार आहे. ही बाब लक्षात घेऊन पोलीस दलाला आपल्या दैनंदिन कार्यपद्धतीत मोठ्या प्रमाणात बदल करावे लागणार आहेत. कायदा सुव्यवस्था संभाळताना तसेच गुन्हेगारांना हाताळताना करोनाला मात्र दूर ठेवण्याची खबरदारी घ्यावी लागणार आहे.

लॉकडाऊनच्या काळात सातत्याने सर्वसामान्य नागरिकांच्या संपर्कात राहिल्याने पोलीस दलातही करोनाना शिरकाव झाला. कर्तव्य पार पाडत असताना अनेकांना लागण झाली तर काहींचा मृत्यू झाला. यामुळे पोलीस कर्मचारी स्वत:ची खबरदारी वैयक्तिक पातळीवर घेत असताना कुठे तरी कमी पडत असल्याचे दिसत होते.

ही बाब लक्षात घेऊन पुणे पोलिसांनी पोलिसांच्या सुरक्षेसाठी जागतिक स्तरावरील नियम, प्रतिबंधात्मक उपाय आदींची माहिती घेऊन पोलिसांना कर्मचाऱ्यांना कर्तव्य पार पाडताना वेळोवेळी खबरदारीच्या उपाययोजनांची माहिती दिली गेली. यासाठी सुरुवातीला तोंडी नियमावली नंतर हळूहळू लिखीत स्वरूपात नियमावली करण्यात आली. नियमावलीचे सुरुवातीला तीन सेट करण्यात आले. यानंतर चौथा फायनल सेट करण्यात आला. यासाठी अतिरिक्त पोलीस आयुक्त आणि दोन पोलीस उपायुक्त यांची समिती नेमली. या समितीने नियमावलीमध्ये सातत्याने अपडेट करून व प्रत्यक्षात रस्त्यावर कर्तव्यात असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अनुभवावरून त्याने डॉक्युमेंटेशन केले. हे डॉक्युमेंटेशन बुधवारी पोलीस महासंचालकांकडे सुपूर्द करण्यात आले आहे.



“लॉकडाऊनच्या कालावधीत पोलीस यंत्रणेला कामकाज करताना प्रत्यक्षात कोणत्या अडचणी येत होत्या याची दखल घेतली गेली. सुरुवातीला करोनाशी लढण्यासाठी तोंडी सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते. यानंतर एक समिती नेमून कामकाजासंदर्भात नियमावली तयार करण्यात आली. या नियमावलीचे डॉक्युमेंटेशन करण्यात आले असून त्याची प्रत पोलीस महासंचालकांकडे सुपूर्द करण्यात आली आहे. जेणेकरून या नियमावलीचा सर्व पोलीस दलाला उपयोग होऊ शकतो.

– डॉ. रवींद्र शिसवे,
सहपोलीस आयुक्त, पुणे



- प्रत्येक पोलीस ठाण्यात आजारी पोलिसांची माहिती व काळजी घेण्यासाठी अधिकारी
- गुन्हेगारांना हाताळताना घ्यावयाची काळजी
- गर्दी किंवा सिग्नल यंत्रणेवर कार्यरत असताना घ्यायची काळजी
- दैनंदिन कामकाजात सोशल डिस्टंस, मास्क, सॅनिटायझर वापराच्या सूचना
- ऑन लाईन पद्धतीचा जास्तीत जास्त वापर करणे
- पोलिसांच्या वेबसाईटवर जास्तीत जास्त ऑन लाईन पद्धतीने तक्रारी स्वीकारणे

प्रवासा

सामान्यांच्या प्र
अशी एसटीची
प्रवाशांच्या कलक
ही प्रवाशांच्या प
परिस्थिती येथून पु

**Prabhat 29.05.20**

# पोलीस उपनिरीक्षकाची करोनावर मात

## पुन्हा कर्तव्यावर रुजू

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. २८** - पोलीस उपनिरीक्षक राजू पवार यांनी करोनावर मात केली आहे. बरे झाल्यानंतर पुन्हा ते कर्तव्यावर हजर झाले. त्यावेळी पोलीस आणि नागरिकांनी टाळ्या वाजवत आणि अंगावर फुलांची उधळण करत त्यांचे स्वागत केले.

संपूर्ण जगच करोनाच्या विळख्यात आहे. महाराष्ट्र पोलीस दलातील पुणे शहर दत्तवाडी पोलीस स्टेशनमध्ये नियुक्तीस असणारे पवार यांना कर्तव्यावर असताना करोना संसर्गाची बाधा झाली.

त्यांनी अत्यंत धीराने या आजारावर उपचार घेऊन स्वत:ची विल पॉवर जागृत करून या गंभीर आजारपणावर मात करून पुन्हा पुणे शहर पोलीस दलात सेवेत पदार्पण केले आहे.

घरीच रहा
सुरक्षित रहा!
Punit Balan Group

**Lokmat 06.05.20**

# पुण्यामध्ये ९ वाईनमालकांवर गुन्हे दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** दारूविक्रीसाठी परवानगी देताना दिलेल्या अटींचे पालन न केल्याने व पुण्यामधील ९ वाईन शॉप मालकांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. त्यात विश्रामबाग पोलीस ठाणे व चंदननगर पोलीस ठाण्यात प्रत्येकी एक, तर हडपसरमध्ये ७ गुन्हे दाखल आहेत.

रोहित वाईन्स, शनि मंदिराजवळ, हडपसर, एम आर वाईन्स, ससाणेनगर, एशियन वाईन्स, आकाशवाणी, एस एस घुले वाईन्स, रासकर चौक, अजंठा वाईन्स, गाडीतळ, राजधानी वाईन्स आणि कुणाल वाईन्स या वाईन शॉपच्या मालकांवर हडपसर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.



दारू विक्रीसाठी परवानगी देताना फिजिकल डिस्टन्सिंग पाळणे व प्रत्येक ग्राहकाचे थर्मल स्क्रीनिंग केल्यावरच त्याला दारू विक्री करण्याचे तसेच मास्क न घालणाऱ्यांना विक्री न करण्याचे बंधन घालण्यात आले होते.

या दुकानदारांनी कोणत्या ग्राहकात फिजिकल डिस्टन्सिंगचा व थर्मल स्क्रीनिंगचा वापर न करता मास्कचा वापर न करता लोकांची गर्दी जमविली. त्यामुळे शासकीय आदेशाचा व मार्गदर्शक तत्त्वांचा भंग करुन कोरोना संसर्ग पसरविण्याची कृती केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**Pudhari 06.05.20**

# दहा वाईन मालकांवर गुन्हे

## नियम भंगाबद्दल पोलिसांची कारवाई

पुणे/हडपसर : पुढारी वृत्तसेवा

मद्यविक्री करताना नियमांचे पालन न केल्याप्रकरणी हडपसर परिसरातील सात वाईन मालकांवर हडपसर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. शनिमंदिराजवळील रोहित वाईन्स, एम. आर. वाईन्स ससानेनगर, एशियन वाईन्स आकाशवाणी, एस. एस. घुले वाईन्स, अजंठा वाईन्स, राजधानी वाईन्स, कुणाल वाईन्स यासह अन्य अशा दहा वाईन्स शॉपच्या मालकांवर गुन्हे दाखल केले आहेत.

सोमवारपासून शहरातील काही भाग वगळता इतर ठिकाणी वाईन्स शॉप सुरू करण्यास प्रशासनाने सशर्त परवानगी दिली. मात्र, पहिल्याच दिवशी मद्यप्रेमींनी दुकानासमोर तुडुंब गर्दी केली. लांबच्या लांब रांगा लागल्या, ऐवढच नाही तर अनेकांनी दारू खरेदी करताना वादावादीदेखील केली. शेवटी पोलिसांनी हस्तक्षेप करीत काहींना लाठ्यांचा प्रसाद दिला. दिवसभरातील या घोळात सोशल डिस्टन्सिगचा अगदी बोजवारा उडाला.

### नियमांचा भंग

मद्यविक्री करीत असताना कोणती खबरदारी घेतली जावी याबाबत दिलेल्या सूचनेनुसार संबंधित दुकानदारांनी सोशल डिस्टन्सिगचे नियम पाळले नाहीत, तसेच आलेल्या ग्राहकांसाठी थर्मल स्क्रीनिंगचा वापर केला नाही, मास्कचा वापर न करता लोकांची गर्दी जमा केली. त्यामुळे शासकीय आदेशाचा व मार्गदर्शक तत्त्वांचा भंग करून मानवी जीवितास धोकादायक असलेल्या रोगाचा संसर्ग पसरविण्यास कृती केल्याने त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### तळीरामांना पोलिसांचे रट्टे

मगरपट्टा चौकातील देशी दारू दुकानात बसून पिणाऱ्या तळीरामांना पोलिसांनी रट्टे देत त्यांच्यावर आणि दुकान मालकांवर गुन्हा दाखल केला आहे, अशी माहिती हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश साठे यांनी दिली.

हा सर्व प्रकार समोर आल्यानंतर शहरपोलिसआयुक्तडॉ. के. व्यंकटेशम यांनी रात्री उशिरा ट्विटरद्वारे वाईन्स शॉप चालकांसाठी एक नियमावली जाहीर करून नियम पाळण्याच्या सूचना केल्या. दरम्यान, ज्या वाईन्स दुकानदारांकडून नियमांचे पालन होणार नाही त्यांच्यासह मद्यखरेदीसाठी येणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा दिला. हडपसर पोलिसांनी नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी सात वाईन्स दुकानांवर कारवाई केली. त्यानुसार शहरात चंदननगर परिसरात दोन, विश्रामबाग पोलिस ठाणे व हडपसर परिसरात सात असे एकूण दहा गुन्हे दाखल करण्यात आले असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त बच्चनसिंग यांनी दिली.

### कही खुशी, कही गम

मद्यपींना शिस्त लावण्यासाठी शहरात ठिकठिकाणी पोलिस रस्त्यावर उतरले होते. मात्र अनेक ठिकाणी अगदी एक-एक किलोमीटरपर्यंत मद्यखरेदी करण्यासाठी रांगा लागल्याचे दिसून आले. काही ठिकाणी गर्दीमुळे गोंधळदेखील उडाला. शेवटी तळीरामांच्या उत्साहाला आवर घालण्यासाठी पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. त्यामुळे काही जणांना मद्य मिळाले तर काही जणांचा हिरमोड झाला.

दरम्यान, दुसऱ्या दिवशी मंगळवारीदेखील हेच चित्र शहरातील विविध भागांत पाहायला मिळाले. ज्यांना पहिल्या दिवशी मद्य मिळाले नाही ते दुसऱ्या दिवशी सकाळपासून रांगेत लागले होते. उन्हाचा तडाखा मोठा असल्यामुळे अनेकांनी रांगेत उभे राहताना रस्त्यावरील झाडांच्या सावलीचा सहारा घेतला होता.

**Samana 27.05.20**

# हॅलो... नमस्कार, मी पोलीस आयुक्त बोलतोय!

नवनाथ शिंदे

पुणे, दि. २६ – 'हॅलो... नमस्कार, मी पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम बोलतोय! काय चालले आहे तुमचे? ड्युटीवर असताना काळजी घेताय का? मास्क, फेसशिल्ड, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझरचा वापर करताय ना? प्रतिकारशक्तीवाढीच्या गोळ्या खाल्ल्या की नाहीत? पोलीस कॉलनीत सॅनिटायझरची फवारणी झाली का? कुटुंबातील वयस्क नागरिकांची आणि बाळाची काळजी घ्या, लक्षणे असल्यास अंगावर काढू नका...' अशा पोलीस आयुक्तांच्या सूचना आणि आपुलकीच्या सल्ल्यामुळे कर्मचारी भारावून गेले आहेत.

पोलीस आयुक्तांशी इतर वेळी कधीही मनमोकळेपणाने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा संवाद होत नाही. पोलीस ठाणे,

● पान २




### साहेब, आपण कोरोनाला हरवणार!

थेट पोलीस आयुक्तांशी संवाद होत असल्यामुळे कर्मचारी भारावले आहेत. 'साहेब, आपण मिळून कोरोनाला हरवणार आहोत. महामारीच्या संकटात अधिकारी आम्हाला मदत करीत एकमेकांना आधार देत आहेत. सुरक्षिततेसाठी आम्ही सोशल डिस्टन्स पाळत असून, नागरिकांमध्ये जनजागृती करीत आहोत,' अशी उत्तरे कर्मचाऱ्यांकडून देण्यात येत आहेत.

# हॅलो... नमस्कार, मी पोलीस आयुक्त बोलतोय!

*(पान १ वरून)* चौकीसह अन्यत्र आयुक्तांचा फोन आल्यास भीतीने सर्वांची तारांबळ उडते. मात्र, लॉकडाऊनच्या कालावधीत तब्बल दोन महिन्यांपासून रात्रंदिवस बंदोबस्तावर असलेल्या विविध पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य उंचाविण्यासाठी पुणे पोलीस आयुक्तांकडून आपुलकीने संवाद साधला जात आहे. त्यासोबतच कौटुंबिक विचारपूस आणि आरोग्यासंदर्भात मार्गदर्शन केले जात आहे. कोणत्याही पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांना स्वत: पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम अचानक कंट्रोल रूम आणि स्वत:च्या मोबाईलवरून फोन करीत असल्यामुळे कर्मचारी भारावले आहेत. विशेषत: महिला कर्मचाऱ्यांची विचारपूस करताना, तुमचे काम चांगले असून, बाळाला सांभाळूनही तुम्ही वेळेत ड्युटीवर हजर होत असल्याने त्यांनी कौतुक केले. 'आई-वडिलांना काळजी घ्यायला सांगा, ड्यूटीवर असताना सोशल डिस्टन्स पाळा, नागरिकांना मदत करीत असताना सुरक्षितता बाळगा. 'रेड झोड' असताना पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांचे कामकाज उल्लेखनीय आहे. तुमच्या कामाला सॅल्युट,' अशा रीतीने पोलीस आयुक्तांकडून कर्मचाऱ्यांशी संवाद साधला जात आहे.

पोलीस आयुक्तांच्या संवादामुळे दोन महिन्यांपासून ड्यूटी करताना आलेला थकवा, मानसिक ताणतणाव कमी होण्यास मदत झाली असल्याची प्रतिक्रिया कर्मचाऱ्यांनी दिली आहे. दरम्यान, याआधीही पोलीस आयुक्तांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कार्याची तुलना युद्धभूमीशी केली होती. 'शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या कामगिरीला शब्द नाहीत,' असे गौरवोद्गार त्यांनी काढले होते. 'हम होंगे कामयाब एक दिन, मन में है विश्वास पुरा है विश्वास...' असे म्हणत त्यांनी कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्यांचे मनोधैर्य वाढविले होते.

**Pudhari 01.05.20**

# पुण्यात हॉटस्पॉट भागातील निर्बंध आणखी कडक

(पान १ वरून...) करताना दिसत आहेत. नागरिक सकाळी आणि सायंकाळी फिरत आहेत. कारवाई केल्यानंतरदेखील या नागरिकांची संख्या कमी होत नसल्याचे दिसत आहे. तर दुसरीकडे शहरात कोरोना रुग्णांची संख्या चिंताजनकरीत्या वाढत आहे. पहिल्यापासून हॉटस्पॉट ठरलेल्या भागातच हे कोरोना रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. कडक उपाययोजना करूनदेखील त्यात काही फरक पडलेला नाही. भाजीपाला, किराणा आणि मेडिकलची दुकाने या भागात उघडी असायची. त्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने बाहेर पडत असत. त्यामुळेदेखील रुग्ण संख्या वाढत आहे. यामुळेच आता या परिसरात प्रशासनाकडून कडक पावले उचलण्यात आली आहेत. नागरिकांनीही पोलिसांना आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे अवाहन करण्यात आले आहे. पुणे पोलिसांनी १ मे ते ३ मे पर्यंत हे अतिरिक्त निर्बंध लागू केले आहेत.

पुढील तीन दिवस या भागात किराणा, भाजीपाला, अंडी, मटण, फळे, पूर्णपणे विक्री बंद असणार आहे. रूग्णालय, अत्यवस्थ रूग्णांची वाहतूक, तसेच औषधालये याबाबत देण्यात आलेल्या सवलती कायम ठेवण्यात आल्या आहेत. भागात दूध विक्री केंद्र फक्त दिवसभरात दोन तासांसाठी म्हणजेच सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत खुली असणार आहेत. तर घरपोच दूध देणाऱ्यांना सकाळी ६ ते १० या वेळेत सेवा देता येणार आहे. त्यासोबतच दुधाच्या वाहतुकीस निर्बंध नसतील. शासकीय अन्नधान्य वितरण कार्यालयाकडून सुरू असलेल्या कार्यवाहीसाठी हे निर्बंध लागू नाहीत.

**Pudhari 21.05.20**

# हडपसरमध्ये पोलिसांचे संचलन

## नागरिकांनी केले औक्षण, पुष्पवृष्टीही

हडपसर : पुढारी वृत्तसेवा

हडपसर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांकडून पथसंचलन करण्यात आले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये जाणीव जागृती व्हावी आणि नागरिकांनी घराबाहेर पडू नये, या उद्देशाने २४ तास बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांनी सोशल डिस्टन्सिंग पाळत पथसंचलन केले.

सध्याच्या संचारबंदीच्या काळात पोलिस आपले कर्तव्य चोखपणे बजावताना दिसत आहेत. यावेळी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना टॉवेल-श्रीफळ देऊन सन्मानित केले. तसेच टाळ्या, शंखनाद, पुष्पवृष्टी करून त्यांचे मनोबल वाढवले. "भारत माता की जय", "वंदे मातरम", "महाराष्ट्र पोलिस दलाचा विजय असो" असा जयघोषही या वेळी करण्यात आला.

या संचलनाची सुरुवात तुकाईदर्शन, काळेपडळ, ससाणेनगर, हडपसर गाव, गाडीतळ परिसरातून झाली. त्यानंतर हडपसर पोलिस ठाण्यात त्याचा समारोप झाला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सोशल डिस्टन्स पाळावे, विनाकारण घराबाहेर पडू नये, असे या वेळी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले.

हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश साठे यांनी या वेळी मार्गदर्शन केले.





हडपसर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांकडून पथसंचलन करण्यात आले. या वेळी नागरिकांनी पोलिसांचे औक्षण करून पुष्पवृष्टी केली.

**Sakal 23.05.20**

# पोलिस मित्राचा प्रामाणिकपणा

पुणे, ता. २२ : भाजी खरेदी करून घरी परत जाताना रस्त्यावर सापडलेले पाच हजार रुपये एका पोलिस मित्राने प्रामाणिकपणे खडकी पोलिस ठाण्यात जमा केले.

त्या पोलिस मित्राचे नाव आहे विशाल केदारी. जुन्या मुंबई-पुणे रस्त्यावरून खडकीकडे जाताना अंडी ऊबवनी केंद्राच्या सिग्नलजवळ केदारी यांना हे पैसे सापडले. त्यांनी ते जवळील सिग्नलवर थांबलेल्या वाहतुक पोलिसाला देऊ केले. त्यानंतर त्या वाहतुक पोलिसाच्या सांगण्यावरून त्यांनी ते पैसे खडकी पोलिस स्टेशनमध्ये जमा केले. केदारी यांचा प्रामाणिकपणा पाहून पोलिसांनी देखील त्यांचे कौतुक केले. लवकरच खडकी पोलिसांतर्फे त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

**Sakal 11.05.20**




टिळक चौक : लॉकडाउन काही प्रमाणात शिथिल केल्याने शहरात मुख्य रस्त्यांवर गर्दी वाढू लागली आहे. याला नियंत्रण ठेवण्यासाठी मुख्य चौकात वाहनचालकांची तपासणी करताना पोलिस.

**Sakal 16.05.20**



**Punyanagari 29.05.20**

पुणेकरांना खाकीचा धाक!



**Samana 25.05.20**

# न दमलेल्या पोलिसांची कहाणी

पुणे, दि. २४ (प्रतिनिधी)- 'पप्पा तुम्ही लवकर घरी या... किती दिवसांपासून तुम्ही मला भेटले नाहीत... मम्मी मला गावी करमत नाही, तू मला लवकर घ्यायला ये...', 'पोरा रात्रीचे नऊ वाजले अजून ड्युटीवर हाय व्हय रं... काळजी घे रे बाबा...', 'अहो कधी येणार आहात तुमच्या लाडक्याला बघायला?...' हा सगळा व्हर्च्युअल संवाद पुणे पोलिसांच्या कोरोना योद्धांनी फोनवरून कुटुंबीयांशी साधला आहे.

शहरातील प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत रात्रंदिवस कार्यरत असलेल्या शिपायापासून ते वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या ● पान २



"कोरोनाच्या संकटात पोलीस दलातील प्रत्येक कर्मचारी आणि अधिकारी मन लावून काम करीत आहेत. त्यामुळे नागरिकांना आधार मिळाला आहे. शहरातील प्रत्येक नागरिक कुटुंबातील सदस्य असल्याप्रमाणे काळजी घेतली जात आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांनी आई-वडील, लहान मुले, परिवाराला दूर ठेवून ड्यूटीला प्राधान्य दिले आहे.

- डॉ. के. व्यंकटेशम,
पोलीस आयुक्त, पुणे

# न दमलेल्या पोलिसांची कहाणी

*(पान १ वरून)* कुटुंबीयांची ताटातूट झाली आहे. मात्र, समाजासाठी आणि कोरोनाच्या लढ्यासाठी या कालावधीत आम्ही मनापासून नोकरी जगल्याची भावना पोलिसांनी व्यक्त केली. दोन महिने सलग कर्तव्य बजावूनही न दमलेल्या पोलिसांची ही कहाणी!

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे शहरात २३ मार्चपासून संचारबंदी लागू करण्यात आली. तेव्हापासून ३३ पोलीस ठाण्यासह १०३ पोलीस चौक्यांतील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी कोरोनाविरुद्ध लढण्यासाठी शड्डू ठोकले आहेत. संचारबंदीत वाहनांची तपासणी करणे, विनाकारण फिरणाऱ्यांविरुद्ध कारवाईचा बडगा उगारणे, थकीत दंडवसुली करणे, मजूर, गरीब, विद्यार्थी, ज्येष्ठ महिला, भिक्षेकऱ्यांना खाण्या-पिण्याची सोय करणे, हद्दीतील वाद, भांडणे सोडविण्यासाठी प्राधान्य देणे, कायदा व सुव्यवस्था टिकवण्यावर भर देणे, नागरिकांमध्ये कोरोना व्हायरसची जनजागृती करणे, कुटुंबाला वेळ न देता सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न पोलिसांकडून करण्यात आला आहे. या दोन महिन्यांच्या कालावधीत आम्हाला मनापासून नोकरी करता आली. ताण-तणाव वाढत असतानाही नागरिकांच्या सेवेसाठी सकाळी सात वाजल्यापासून ते रात्री बारा वाजेपर्यंत ड्युटीचे समाधान मिळाले आहे. स्वत:च्या कुटुंबापेक्षा इतरांसाठी आमचे कुटुंब गावी नेऊन ठेवले आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत पत्नी-मुलगा, मुलगी, आई-वडील सातत्याने काळजी आमची करीत असतात. मात्र, कोरोनाच्या लढ्यात काम करण्यासाठी ही नवीन संधी असल्यामुळे आम्ही एकमेकांना आधार देत झोकून दिले आहे. संचारबंदीत नागरिकांना फिरण्यास केलेल्या बंदीमुळे अनेकवेळा वादविवाद झाले. धक्काबुक्की, मारहाण, शिवीगाळ आम्ही सहन केली, पण रूटमार्चवेळी आमच्यावर झालेला फुलांचा वर्षाव आणि मदतीसाठी धावून आलेले नागरिक पाहून सर्वकाही विसरून गेल्याची प्रतिक्रिया बहुतांश पोलीस कर्मचाऱ्यांनी दिली.

"लॉकडाऊननंतर संचारबंदीतही अनेक नागरिक विनाकारण घराबाहेर फिरत होते. शुल्लक कारणांवरून आमच्याशी वादावादी करीत होते. काही वेळेस पोलीस त्यांचे दुश्मन असल्यासारखे वागत होते. मात्र, कोरोना हे मोठे आव्हान असल्यामुळे स्वत:ला जपून जोखीम घेत सेवा करण्यास प्राधान्य दिले. देशासाठी जवान सीमेवर लढतात. तशीच काम करण्याची संधी आम्हाला मिळाली. अनेक नागरिकांनी सहकार्य केले. आता लॉकडाऊन संपल्यानंतर कुटुंबीयास वेळ देण्याचा प्रयत्न करणार आहे.

-उत्तम चक्रे, पोलीस निरीक्षक, खडक पोलीस ठाणे

**Samana 30.05.20**

# पैशांची अडचण; महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी)- लॉकडाऊनमुळे अनेकांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. अशाच एका औषधाच्या दुकानात काम करणाऱ्या व्यक्तीला कामावर न घेतल्याने त्यांच्या घरात खाण्यापिण्याची चणचण भासू लागल्याने पत्नीने गुडनाईट लिक्विड पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. मात्र, उत्तमनगर पोलिसांनी तातडीने मदत केल्याने मोठा अनर्थ टळला आहे.

महिलेचे पती एका औषध विक्रेत्या दुकानात कामास होते. परंतु, लॉकडाऊनमुळे त्यांना कामावर घेतले नव्हते. त्यामुळे त्यांना पैशांची चणचण भासत होती. खाण्याचेही हाल झाले होते. यामुळे महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केला. याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पंधरकर यांनी कुटुंबाला ५० किलो तांदूळ, तेल इतर जीवनावश्यक वस्तू सामाजिक संस्थेच्या मदतीने दिल्या. त्यानंतर पंधरकर यांनी औषध विक्रेता दुकानाच्या मालकाला फोन करून महिलेच्या पतीला कामावर रुजू करून घेण्यास विनंती केली. त्यानुसार मालकाने त्याला कामावर पुन्हा घेतले. पोलिसांनी संसार वाचविल्याने दांम्पत्याने आभार मानले.

**Pudhari 04.05.20**



मोदीखाना येथे संचलन करताना लष्कर पोलिस कर्मचारी.

# लष्कर पोलिसांकडून मोदीखान्यात मार्च

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

लष्कर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मोदीखाना परिसरात पोलिसांनी रविवारी संचलनाचे (मार्च) आयोजन करण्यात आले होते. यावेळी लष्कर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भोसले यांच्या मार्गदर्शनात या संचलनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नागरिकांना सॅनिटायझर आणि मास्कचे वाटप करण्यात आले. आम्ही रस्त्यावर आहोत, तुम्ही घरातच राहा, असे आवाहन मोर्चाच्या निमित्ताने करण्यात आले. पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील मोदीखान्यात करोनाचा वाढता संसर्ग लक्षात घेत अधिकाधिक नागरिकांची तपासणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी बोर्ड आणि सरदार पटेल रुग्णालय प्रशासनाला दिल्या आहेत. त्यानुसार सोमवारपासून तपासणी करण्यात येणार आहे.

**Sakal 07.05.20**

# नियमांचे पालन न केल्यामुळे दारूच्या तेरा दुकानांवर गुन्हे

**पुणे, ता. ६ :** दारु विक्रीसाठी परवानगी देताना दिलेल्या नियमांचे पालन न केल्यामुळे शहरातील दारूच्या तेरा दुकानांवर मंगळवारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे आता वाईन शॉप चालकांना मद्याची विक्री करताना अधिक खबरदारी घ्यावी लागणार आहे.



गुन्हा दाखल करण्यात आलेले एक दुकान विश्रामबाग, दोन दुकाने चंदननगर, चार दुकाने चतु:श्रृंगी आणि हडपसर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सात दुकाने आहेत. दारूची विक्री करण्यासाठी परवानगी देताना सोशल डिस्टन्सिंग पाळणे, मास्क घालणे आदी नियम आणि अटी घालून देण्यात आल्या होत्या. मात्र दुकान मालकांनी दिलेल्या नियम आणि अटींचे भंग करून कोरोनाचा संसर्ग पसरवण्याची कृती केल्याने त्यांच्यावर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा आणि महाराष्ट्र कोविड उपाय योजनांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे. राज्यातील कंटेनमेंट झोन वगळता 'रेड झोन'मध्ये येणाऱ्या जिल्ह्यातही मद्यविक्रीला चार मेपासून सशर्त परवानगी मिळाली होती. महिनाभरानंतर दुकाने उघडणार असल्याने राज्यभरातील वाईन शॉप्सवर तळीरामांनी सकाळपासून गर्दी केली होती. त्यामुळे दुकानाबाहेर सोशल डिस्टनसिंगच्या फज्जा उडाला होता. पोलिसांनी काही ठिकाणी वाईन शॉप्स बंद केले होते. दारू खरेदीसाठी नागरिकांकडून वाईन शॉपसमोर गर्दी केली जात आहे.

**Pudhari 05.05.20**

# पोलिसांवरील ताण वाढला

पुणे : पुढारी वृत्तसेवा

शहरात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन वाढविण्यात आला असला तरी काही ठिकाणी अटी शिथिल करण्यात आल्यामुळे पोलिसांवरील अतिरिक्त ताण वाढल्याचे सोमवारी विविध ठिकाणी पाहायला मिळाले.



नाकाबंदीसाठी नेमून देण्यात आलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांकडून नागरिकांना घरातच बसण्याचे आवाहन करण्यात येत आहे. त्यातच पुण्यातील मद्यविक्रीची दुकाने सुरू करण्यास परवानगी मिळाल्याने तळीरामांची या मद्यविक्रीच्या दुकानांसमोर झुंबड पाहायला मिळाली. यामुळे सोशल डिस्टन्सिंगचा फज्जा उडाल्याने घ्यावी लागली. काही ठिकाणी तर गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्जही करावा लागला. अनेक प्रयत्न करूनही गर्दी कमी होत नसल्याने शेवटी पोलिसांनी मद्यविक्रीची दुकाने बंद केली. त्याबरोबरच परराज्यातील नागरिकांना त्यांच्या गावाकडे जाण्यासाठी सध्या पोलिस ठाण्याच्या स्तरावर नावनोंदणी सुरू असून, गावाकडे जाण्यासाठी वाहतुकीची साधने (उदा. रेल्वे, ट्रॅव्हल्स) कशी उपलब्ध करून देता येतील याचे नियोजन सध्या सुरू आहे. परंतु, नागरिक विनाकारण पोलिस यंत्रणेवरील ताण वाढवत आहे. अशीच गर्दी वारजे परिसरात परप्रांतियांनी करून आंदोलनाचा पवित्रा घेतला. या वेळी पोलिसांना पोलिसी खाक्या दाखवावा लागला.

लॉकडाऊनमधील बंदोबस्तापासून ते क्वारंटाईनमधील नागरिकांना जेवण पुरविण्यासह परप्रांतीय कामगारांच्या याद्या तयार करून त्यांना त्यांच्या मूळ गावी पोहचण्यापर्यंतचा फॉलोऑफ

**Lokmat 10.06.20**

# मास्कशिवाय फिरणाऱ्या १११२ जणांवर कारवाई

**पुणे :** कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये, यासाठी घराबाहेर पडणाऱ्या प्रत्येकाने मास्क वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे. असे असतानाही मास्क न वापरता फिरणाऱ्या ११२ जणांवर शहर पोलिसांनी आतापर्यंत कारवाई केली आहे. शहरातील कंटेन्मेंट झोन व्यतिरिक्त इतर भागातील निर्बंध गेल्या २० दिवसांपासून शिथिल करण्यात आले आहे. त्यामुळे शहरातील वाहतूक वाढली आहे.

कोरोनाचा वाढता विळखा लक्षात शहर पोलीस दलाने मास्क शिवाय विनाकारण बाहेर फिरणाऱ्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. १ जूनपासून ८ जूनपर्यंत शहरातील विविध भागात आतापर्यंत ११२ जणांवर मास्कशिवाय फिरल्या प्रकरणी कलम १८८ नुसार कारवाई करून त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले असल्याची माहिती पोलीस उपायुक्त बच्चन सिंह यांनी दिली. ही कारवाई यापुढेही सुरु राहणार असून नागरिकांनी मास्क घातल्याशिवाय घराबाहेर पडू नये, असे त्यांनी आवाहन केले आहे.

**Pudhari 15.06.20**

## बोपोडी परिसरात पोलिसांचे संचलन

खडकी, दि. १४ - लॉकडाउन काळात एकही रुग्ण नसलेल्या औंध बोपोडी भागात शिथिल झाल्यानंतर वाढ होत आहे. लोक विनाकारण रस्त्यावर फिरत असल्याने त्यांच्यावर वचक राहण्यासाठी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या तुकडीने रविवारी परिसरात संचलन झाले. या पथसंचलनाची सुरुवात भोपळे चौक येथून झाली. तेथून बोपोडी रेल्वे फाटक, चांदणी चौक, गोल्डन चौक, शिवाजी उद्यान भाऊ पाटील रोड या भागात संचलन करण्यात आले. यात आरपीएफ क्रमांक एकचे पोलीस उपायुक्त, कमांडर दोनचे सहायक पोलीस आयुक्त तसेच ७७ कमांडर कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

**पोलिसांचे संचलन...**



खडकी : औंध-बोपोडी भागात केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या तुकडीचे रविवारी संचलन झाले.

**Prabhat 01.06.20**

## खडकीत किराणा दुकानातून सिगारेट जप्त

पुणे, दि. ३१ - कोरोना विषाणू प्रादुर्भाव पार्श्वभूमीवर राज्यात तंबाखू, विडी, सिगारेट आदी तंबाखूजन्य पदार्थ विक्रीवर निर्बंध घातले आहेत. तरीही किराणा मालाच्या दुकानातून बेकायदेशीरित्या सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करीत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने शनिवारी दि. ३१ मे रोजी खडकीतील तांबोळी जनरल स्टोअर्स या दुकानावर छापा टाकला तसेच सिगारेटचे बॉक्स तसेच इतर तंबाखूजन्य पदार्थ असा एकूण ४० हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

**Prabhat 07.06.20**

## तंबाखू विक्रेत्याकडून ३ लाखांचा माल जप्त

पुणे, दि. ६ - राहत्या घराच्या पार्किंगमधून देशी-विदेशी सिगारेट, गायछाप अशा तंबाखूजन्य पदार्थांची चोरी-छुपे विक्री करणाऱ्याला अमली पदार्थ विरोधी पथकाने येरवड्यात पकडले. यावेळी त्याच्या ताब्यातून ३ लाख ६३ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. असिफ रफिक गडेद (वय २५,रा. प्रतिकनगर, येरवडा) असे आरोपीचे नाव असून, त्याच्या विरुद्ध येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे निरीक्षक विजय टिकोळे, सहाय्यक निरीक्षक रायकर, कर्मचारी जोशी, काकडे हे त्यांच्या पथकासह येरवडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गडेद हा तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती त्यांना मिळाली होती. त्यानुसार छापा टाकून कारवाई करण्यात आली.

**Lokmat 16.06.20**

## बेकायदा सुरु असलेल्या सलूनवर कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** निवडक लोकांना सेवा देणाऱ्या कोरेगाव पार्क येथील ट्रम्प सलून व स्पावर पोलिसांनी कारवाई केली.

दुकानाची मालकीण प्रियांका प्रभाकरराव मलाह (वय २५, रा. शॉन लेक सोसायटी, नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क) आणि हेअर वॉश सेवा देणारा कामगार जहांगीर दिलमोहम्मद आलम (वय २२) यांच्याविरुद्ध राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट कोविड १९ उपाययोजनाचे कलम ११ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेच्या युनिट २ मधील पोलीस नाईक मोहसीन शेख यांना ट्रम्प सलून व स्पामध्ये निवडक ग्राहकांना सलूनसंबंधित सेवा दिली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून खात्री केली. त्यानंतर तेथे छापा घातला. तेव्हा जहांगीर आलम हा एका ग्राहकाला हेअर वॉश सेवा देताना आढळून आला.

यापूर्वीही कोरेगाव पार्कमधील एका स्पामध्ये महिलांना मोबाईलवर अपॉईमेंटमध्ये देऊन त्यांना बोलावून सलूनची सेवा देत असताना पोलिसांनी रंगेहाथ पकडले होते.

**Loksatta 08.06.20**



पुणे पोलिसांकडून तयार करण्यात आलेल्या 'लोकभावनांचे सर्वेक्षण' या पुस्तिकेचे प्रकाशन रविवारी पुणे पोलीस आयुक्तालयात गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, पिंपरीचे पोलीस आयुक्त संदीप बिष्णोई, सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप पाटील, अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे, डॉ. संजय शिंदे, सुनील फुलारी आदी उपस्थित होते.

# चुकीची माहिती पसरवणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करा

## अनिल देशमुख यांच्या सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : करोनाचा संसर्ग वाढीस लागलेला असताना प्रशासनाने निर्बंध लागू केले. अशा परिस्थितीत समाजात चुकीची माहिती पसरविणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करा, अशा सूचना राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी रविवारी दिल्या. करोनाच्या संसर्गाला अटकाव करण्यासाठी पुणे, पिंपरी तसेच ग्रामीण पोलिसांनी केलेल्या उपाययोजनांचे त्यांनी या वेळी कौतुक केले.

पुणे पोलिसांकडून करोनाचा संसर्ग, पोलिसांचा बंदोबस्त अशा विविध बाबी उलगडणारी 'लोकभावनांचे सर्वेक्षण' ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन रविवारी पुणे पोलीस आयुक्तालयात देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले, या प्रसंगी ते बोलत होते. पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम, पिंपरीचे पोलीस आयुक्त संदीप बिष्णोई, सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे, अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक मोराळे, डॉ. संजय शिंदे, सुनील फुलारी, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप पाटील आदी या प्रसंगी उपस्थित होते.

देशमुख म्हणाले, 'पुणे पोलिसांकडून करोनाचा संसर्ग वाढीस लागल्यानंतर बंदोबस्तासाठी विशेष पोलीस अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची बंदोबस्तासाठी मदत घेण्यात आली. विशेष पोलीस अधिकारी म्हणून साडेपाच हजार जणांची नेमणूक करण्यात आली. हा उपक्रम चांगला असून यापुढील काळात असा उपक्रम सुरू ठेवावा. काही जण समाजात मुद्दामून चुकीची माहिती पसरवत आहेत. अशांविरोधात पोलिसांनी कडक कारवाई करून गुन्हे दाखल करावेत. पुणे, पिंपरी शहर आणि जिल्ह्यात पोलिसांनी करोना संसर्गाला अटकाव करण्यासाठी केलेले काम कौतुकास्पद आहे. पुणे पोलिसांनी केलेल्या उपाययोजना आणि बंदोबस्ताबाबत ८३ टक्के नागरिकांनी सर्वेक्षणात समाधान व्यक्त केले आहे. पोलिसांनी केलेले काम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

### पिंपरीसाठी उपायुक्तांची नेमणूक करा

पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार वाढत आहे. पोलिसांचे मनुष्यबळ विस्ताराच्या तुलनेत तसे अपुरे आहे. पिंपरी शहरात पोलीस उपायुक्त दर्जाचे आणखी काही अधिकारी हवे आहेत. उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करा, अशी मागणी पिंपरीचे पोलीस आयुक्त संदीप बिष्णोई यांनी या कार्यक्रमात केली.

**Lokmat 03.06.20**

# जप्त केलेली वाहने परत करण्यास सुरुवात

## वाहनचालकांना द्यावी लागणार अनामत रक्कम अन् बंधपत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : लॉकडाऊनच्या काळात नियमांचे उल्लंघन केल्याने जप्त करण्यात आलेली वाहने आता वाहनचालकांना परत देण्यास पोलिसांनी सुरुवात केली आहे. त्यासाठी वाहनचालकांकडून अनामत रक्कम व बंधपत्र घेण्यात येत आहे. दुचाकीला दीड हजार आणि चारचाकीला अडीच हजार रुपये अनामत रक्कम भरावी लागणार आहे.

लॉकडाऊनच्या काळात संचारबंदी असतानाही अनेक वाहनचालक विनाकारण फिरत होते. त्यामुळे पोलिसांनी या वाहनचालकांवर १८८ अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांचे वाहन जप्त करण्यास सुरुवात केली होती. शहरातील सर्व पोलीस ठाणी व वाहतूक शाखेने ४५ हजारांहून अधिक वाहने जप्त केली आहेत. लॉकडाऊन आता शिथिल करण्यात आला आहे. आता रात्री ९ ते पहाटे ५ पर्यंतच संचारबंदी ठेवण्यात आल्याने पोलिसांनी नागरिकांची ही वाहने परत करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, त्यांच्यावर न्यायालयीन प्रक्रिया केली जाणार आहे.

ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहन जप्त करण्यात आले आहे. तेथील पोलीस निरीक्षकांच्या नावाने अर्ज करायचा आहे. अर्जासोबत बंधपत्र देऊन दुचाकीसाठी दीड हजार व चारचाकी वाहनांसाठी अडीच हजार रुपये अनामत रक्कम पोलिसांकडे जमा केल्यावर वाहन परत मिळणार आहे.

या गुन्ह्यात वाहन न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वाहन जप्त करून ठेवण्यात येणार नाही. त्यांच्यावर खटला चालविण्यात येईल. त्या दाव्यात न्यायालयाने संबंधित वाहनचालकाला दंड सुनावल्यानंतर अनामत रकमेतून दंडाएवढीच रक्कम जमा करण्यात येत आहे. मात्र, वाहनचालकाची चूक आढळून आली नाही व न्यायालयाने दंड केला नाही तर संबंधित रक्कम परत केली जाणार आहे.



> पोलिसांनी वाहनचालकांना त्यांचे जप्त केलेले वाहन परत करण्यास सोमवारपासून सुरुवात केली आहे. नागरिकांनी संबंधित पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकांशी संपर्क साधावा. अर्ज व अनामत रक्कम दिल्यानंतर त्वरित त्यांचे वाहन परत दिले जाणार आहे.
>
> - डॉ. संजय शिंदे, अतिरिक्त पोलीस आयक्त

**Prabhat 11.06.20**

# गोळीबार मैदान चौकात वाहनचालकांवर कारवाई

वानवडी, दि. १० (प्रतिनिधी) - स्वारगेटकडून गोळीबार मैदान चौकातून कोंढव्याकडे वळताना वाहनांना बंदी असताना या चौकातून वाहने मोठ्या प्रमाणात विरुद्ध दिशेने वळतात, अशा वाहनांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे.

स्वारगेटच्या बाजूने येणाऱ्या वाहनांना गोळीबार मैदान चौकातून पुढे पुलगेटकडे व कोंढवा बाजूकडे वळण्यास वाहतूक विभागाने बंदी घातलेली आहे. बंदी असतानाही हा नियम मोडून चालक कोंढवा बाजूकडे वळत असल्याने अपघात वाढले आहेत. वाहतूक पोलीस पुणे कॅम्पकडील रस्त्यावरच वाहतुकीवर नियंत्रण करण्यासाठी उभे असतात. त्यामुळे कोंढवा बाजूकडे वळण्यास बंदी असतानाही वाहनचालक बेधडकपणे वाहने लुल्लानगर कोंढव्याकडे वळवून वेगाने जात आहेत. त्यामुळे आता पोलिसांनी आपला ठिय्या कोंढवा रस्त्यावर मांडला असून नियम मोडून कोंढव्याकडे वळणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली जात आहे. ही कारवाई कायम सुरू ठेवणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.